
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२८५
REFBK-0021496
REFBK-0021496

# चिरयौवन

अ नि ल



REFBK-0021496

सुविचार प्रकाशन मंडळ

पुणे—नागपूर

चिरयौवन
कविवर्य अनिलांच्या निवडक कवितांचा संग्रह

पहिली आवृत्ती ११ सप्टेंबर १९७१
पुनर्मुद्रण डिसेंबर १९७२
**किंमत पाच रुपये**
सर्व हक्क आ. रा. देशपांडे

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक
श्यामकांत बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१।४.सदाशिव, पुणे ३०
धनतोली, नागपूर १२.

मुद्रक
श्या. श्री. बनहट्टी
श्रीनिवास मुद्रणालय
सुविचार प्रकाशन इमारत
धनतोली, नागपूर १२

'चिरयौवन' हा कविवर्य अनिल यांच्या निवडक कवितांचा संग्रह आहे.

११ सप्टेंबर १९७१ या दिवशी कविवर्य अनिल एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या ७१ व्या वाढदिवशी 'चिरयौवन' प्रकाशित करण्याची संधी मिळत आहे, याबद्दल फार आनंद होतो. स्वत: अनिलांनी निवडलेल्या त्यांच्या उत्कृष्ट कवितांचे संचयन 'चिरयौवन' मध्ये करण्यात आले आहे. आमच्या विनंतीला मान देऊन कवितांची निवड करून दिल्याबद्दल कविवर्य अनिलांचे आम्ही फार आभारी आहोत.

'चिरयौवन' ला प्रस्तावना लिहिण्याची आमची विनंती मान्य करून तत्परतेने प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल डॉ. भीमराव कुलकर्णी यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रकाशक

# अनुक्रम


नऊ प्रस्तावना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चिरयौवन | ३२ | भग्नमूर्ति |
| ३ | प्रेमाचें ममत्व | ५२ | धुंवारी |
| ५ | शोध | ५३ | शर्वरिणी |
| ७ | आशागीत | ५४ | झळ |
| ९ | सारंग | ५५ | पहाट |
| ११ | सायंतारा | ५७ | प्रीतीची रीत |
| १२ | आळवणी | ५८ | निर्वासित चिनी मुलास |
| १३ | फुलवात | ६४ | भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन |
| १४ | पावसाळा | ६६ | उद्या |
| १६ | हाक | ६७ | प्रीति तुझी माझी |
| १७ | झाला अंधार बाहेर | ६८ | फुलचिमणी |
| १९ | घराकडे जातां | ६९ | श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशी |
| २२ | गरीब आणि पावसाळा | ७१ | मानवना |
| २३ | प्रेम आणि जीवन | ७३ | धडकी |
| २७ | सुप्त ज्वालामुखी | ७९ | बंड |

८१ पेर्तेव्हा
८६ वाट
८७ एकोणीसशे सत्तेचाळीस
९१ आज अंधारी रात
९२ रुसवा
९३ गाठ
९४ पर्यंत
९५ तहान
९७ सारेच दीप कसे मंदावले आता
१०० आंत
१०१ मेघांची भूमि
१०४ अंत
१०५ पीक
१०७ कोंबडा
१०९ रंभागर्भ
११० सांगाती
११२ तटस्थ
११३ पाहतों हें सर्व आम्ही
११५ आई
११७ आणीबाणी
११८ तळ्याकाठीं
११९ खेळणीं
१२० दोन वाटा
१२१ जुई
१२२ श्रावणझड
१२३ लावण्य
१२४ एकाकी
१२५ उशीराचा पाऊस
१२६ काळी
१२७ परिशिष्टे

# कवितांचा कालानुक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | चिरयौवन | नोव्हेंबर, १९४४ |
| २ | प्रेमाचें ममत्व | ३० मार्च, १९२२ |
| ३. | शोध | २७ मे, १९२२ |
| ४. | आशागीत | १२ जून, १९२२ |
| ५. | सारंग | ३० सप्टेंबर, १९२३ |
| ६. | सायंतारा | २९ ऑगष्ट, १९२७ |
| ७. | आळवणी | फेब्रुवारी, १९२८ |
| ८. | फुलवात | नोव्हेंबर, १९२८ |
| ९ | पावसाळा | ऑगष्ट, १९३२ |
| १०. | हाक | ऑक्टोबर, १९३२ |
| ११. | झाला अंधार बाहेर | जून, १९३४ |
| १२. | घराकडे जातां | जून, १९३४ |
| १३ | गरीब आणि पावसाळा | ऑगष्ट, १९३४ |
| १४. | प्रेम आणि जीवन | फेब्रुवारी, १९३५ |
| १५. | सुप्त ज्वालामुखी | मार्च, १९३५ |
| १६. | भग्नमूर्ति | जून, १९३५ |
| १७. | धुंवारी | ऑगष्ट, १९३७ |
| १८. | गर्वहरिणी | डिसेंबर, १९३७ |

| | | |
|---|---|---|
| १९. | झळ | एप्रिल, १९३८ |
| २०. | पहाट | फेब्रुवारी, १९४० |
| २१. | प्रीतीची रीत | ऑक्टोबर, १९४० |
| २२. | निर्वासित चिनी मुलास | मार्च, १९४२ |
| २३. | भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन | २० जून, १९४२ |
| २४. | उद्या-- ! | डिसेंबर, १९४४ |
| २५. | प्रीती तुझी माझी ! | डिसेंबर, १९४४ |
| २६. | फुलचिमणी | नोव्हेंबर, १९४४ |
| २७. | श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशीं | डिसेंबर, १९४५ |
| २८. | मानवता | जानेवारी, १९४६ |
| २९. | धडकी | २३ मे, १९४६ |
| ३०. | बंड | ऑक्टोबर, १९४६ |
| ३१. | पेर्तेव्हा | |
| ३२. | वाट | नोव्हेंबर, १९४६ |
| ३३. | १९४७ | ऑक्टोबर, १९४७ |
| ३४. | आज अंधारी रात | १८ फेब्रुवारी, १९४९ |
| ३५. | रुसवा | ३० जुलै, १९५२ |
| ३६. | गाठ | ३० जुलै, १९५२ |

| | | |
|---|---|---|
| ३७. | पर्यंत | २० सप्टेंबर, १९५२ |
| ३८. | तहान | ४ मार्च, १९५३ |
| ३९. | सारेच दीप कसे मंदावले आता | १२ सप्टेंबर, १९५२ |
| ४०. | आंत | १३ सप्टेंबर, १९५३ |
| ४१. | मेघांची भूमि | १६ ऑक्टोबर, १९५३ |
| ४२. | अंत | १७ ऑक्टोबर, १९५३ |
| ४३. | पीक | ९ मे, १९५७ |
| ४४. | कोंबडा | २३ ऑक्टोबर, १९५८ |
| ४५. | रंभागर्भ | २८ ऑक्टोबर, १९५८ |
| ४६. | सांगाती | २७ ऑक्टोबर, १९५८ |
| ४७. | तटस्थ | ८ फेब्रुवारी, १९५९ |
| ४८. | पाहतों हें सर्व आम्ही | १३ फेब्रुवारी, १९५९ |
| ४९. | आई | ६ नोव्हेंबर, १९५९ |
| ५०. | आणीबाणी | २२ मार्च, १९६० |
| ५१. | तळ्याकाठीं | २५ मार्च, १९६० |
| ५२. | खेळणीं | २ जुलै, १९६० |
| ५३. | दोन वाटा | ऑगष्ट, १९६० |
| ५४. | जुई | १५ ऑगष्ट, १९६० |
| ५५. | श्रावणझड | १६ व २० ऑगष्ट, १९६१ |
| ५६. | लावण्य | १९ व २० सप्टेंबर, १९६१ |
| ५७. | एकाकी | २२ सप्टेंबर, १९६१ |
| ५८. | उशीराचा पाऊस | सप्टेंबर, १९६२ |
| ५९. | काळी | एप्रिल, १९६९ |

ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. २७४९६
काव्य

# प्र स्ता व ना

या सप्टेंबर महिन्यात कविवर्य अनिल आपल्या वयाची सत्तरी ओलां-डीत आहेत. त्यांनी काव्यलेखनाला सुरवात करूनही जवळजवळ पन्नास वर्षांचा कालखड लोटला आहे. अशा वेळी प्रसिद्ध होत असलेला त्यांच्या निवडक कवितांचा हा संग्रह वाचून मन कसे भरून आले आहे ! ते शब्दांतून व्यक्त करण्याची माझ्या मनाची धडपड चालू आहे, परंतु ते वाटते तितके सोपे नाही याची मनाला क्षणोक्षणी जाणीव होत आहे. कारण अनिलांच्या कवितेचे बहिरंग जितके सरळ, साधे वाटते तितकेच तिचे अंतरंग गहिरे आहे. खूप खोलवर आपल्याला ओढून नेणारे आहे.

अनिलांची ही कविता वाचताना गेल्या पन्नास–साठ वर्षांतील महाराष्ट्रा-तील मराठी मनाची आंदोलने आठवतात. आंग्ल वाङमयाच्या माध्यमातून नव्या जगाचा परिचय घडल्यामुळे सनातनी समाजाच्या चौकटीत कुचंबलेल्या तरुणांचे मन विसाव्या शतकाच्या विशीतिशीत कसे हेलपाटत होते याची असंख्य चित्रे डोळ्यासमोर उभी राहतात. त्यांच्या वाङमयीन प्रतिक्रियाही मग लक्षात येऊ लागतात. ह्या प्रतिक्रियांमध्ये स्त्री–पुरुष संबंधांच्या जाणीवा

अतिशय तीव्र होत्या आणि त्याकाळच्या वाङ्मयामध्ये ह्या जाणीवांनाच केंद्रस्थान होते. साहजिकच ह्या जाणीवा तीव्रतेने व्यक्त झाल्या त्या सामाजिक न्यायान्यायाच्या पार्श्वभूमीवर. त्यामध्ये समाजाबद्दलची चीड होती. जातिभेदासारख्या बंधनांनी जखडल्याची आत्यंतिक अगतिकेची भावना होती. ह्या विशिष्ट समाजरचनेत विशुद्ध प्रेमाला स्थान नाही, या कल्पनेने घायाळ झालेल्या मनाचा हुंकार वाङ्मयातून सारखा प्रगट होता. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्या काळी प्रेम हा एक विलक्षण असा ' जाळ–पोळी 'चा विषय होता. प्रेम अंत:करणे जाळीत होते आणि त्यात उडी घेणाऱ्याना पोळून, होरपळून काढीत असे. रूढ वैवाहिक जीवनात रमलेले जीव सोडले तर रूढ चाकोरीबाहेरच्या प्रेमाची आसक्ती बाळगणाऱ्यांचे हुदकेच त्या काळच्या मराठी काव्यात विशेषत्वाने आढळून येतात.

अशा या काळात, पुण्यासारख्या सनातनी वातावरणात फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना अनिलांनी प्रेमसाधना केली आणि निर्माण झालेल्या सामाजिक विरोधापुढे न डगमगता खंबीरपणाने आणि शांतपणाने आपले ध्येय साध्य करून दाखविले. अनिलांचा हा आंतरजातीय प्रेमविवाह होता. १९२१–२२ सालापासून तो १९२९ पर्यंतची, म्हणजे त्यांचा विवाह होईपर्यंतची, ही उपासना त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झाली तीच किती हृद्य प्रकाराने ! १९२२ पासून ३२ पर्यंतच्या त्यांच्या पहिल्यावहिल्या कवितांचा संग्रह ' फुलवात 'च्या रूपाने सादर करण्यात आला. त्यामध्ये यत्किंचित्‌ही कुठे कटुतेचा, सामाजिक अन्यायाचा, किंवा अगतिकतेचा स्पर्श नाही. अचल प्रेमनिष्ठेचा तो पहिलावहिला अविष्कारच आपले मन वेधून घेतो. खऱ्या उत्कट प्रेमाची अनुभूतीच जणू नितळ शब्दांतून व्यक्त होत होती ! ' आधुनिक काव्यातले प्रेम ही एक हृदयाची तळमळ आहे, मनोमन जाणीव आहे, हृदयावरचा चिरकाल टिकणारा संस्कार आहे. त्या प्रेमाचे वर्णन अंतर्मुख हृदयाचे, अंत:करणात उडालेल्या खळबळीचेच असते. ते शरीराची भूक नाही, हृदयाची समरस–हृदयाशी एक होण्याची

धडपड आहे. ते जरी एखाद्या मूर्तीपासून स्फूर्त होत असले तरी त्याची काव्यात्मता अमूर्ततेची आहे. कायिकतेला त्यात प्राधान्य नाही, वैषयिक दृष्टीला त्यात महत्त्व नाही. स्त्रियांच्या वर्णनात शरीरसौंदर्याला अग्रस्थान नाही तर मनाला व भावना-सौंदर्याला आहे. त्यात आत्मप्रत्ययाचा जिव्हाळा आहे ' या शब्दांत अनिलांनी प्रस्तावनेमध्ये जणू काही आपल्या प्रेमकवितेचे नेमके वैशिष्टय सांगून ठेविले होते. ' काव्य म्हणजे संगीतगर्भ विचार ' ही एक काव्याची व्याख्याही अनिलांनी याच प्रस्तावनेत सांगून ठेविली होती. अनिलांनी आपल्या संग्रहाला लिहिलेली ही एकुलती एक प्रस्तावना. ही प्रस्तावना, अनिलांची त्या वेळची कविता आणि अनिलांची प्रेमसाधना यांमध्ये एक अत्यंत निकटत्वाचे असे नाते होते. तत्कालीन प्रेमकवितेमध्ये स्वतःचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी अनिलांना त्या वेळी विस्ताराने प्रस्तावना लिहिण्याची आवश्यकता वाटली असावी, परंतु या प्रस्तावनेतही त्यांनी कुठे स्वतःच्या प्रेमसाधनेची वाच्यता केली नाही, तिच्या मार्गात आलेल्या अडचणींची कुठे पुसटली खूणही दाखविली नाही !

अगदी बावीस साली म्हणजे विवाहापूर्वी सात वर्षे अगोदर लिहिलेल्या कवितेतून ते आपल्या अचल प्रेमनिष्ठेचा उच्चार करीत असताना दिसतात. पुढे वादळ निर्माण होत असताना पाहून, ' नको जाऊं कोमेजून माझ्या प्रीतिच्या फुला रे ' म्हणत ते तिला धीर देतात. त्या प्रसंगी व्यक्त झालेली ' प्रीतिवरी विश्वासून घडीभर सोसूं ऊन ' ही निष्ठाच मुळी त्या काळी मोठी अपूर्वाईची होती. या निष्ठेमागे उदात्ततेचे, मांगल्याचे संस्कार बळकटपणे उभे आहेत. ' फुलवात ' हे त्यांच्या कवितेचे प्रतिकात्मक रूपच या संस्कारांची पुरेपूर ग्वाही देते. ' फुलवाती 'तील गीतमयता, प्रेमाची सच्चाई आणि नवलाई, शांत, संथ तेवणाऱ्या फुलवातीप्रमाणे अंतःकरणांतील तेवणारा प्रेमाचा साक्षात्कार आणि तो व्यक्त करणारी कवीची समधात वृत्ती आजही अपूर्वाईची, नवलपरीची वाटते.

# बारा

कवि अनिल व कुसुमावती यांच्या सफल प्रेमाची स्पंदने व्यक्त करणारी फुलवातीतील कविता मुख्यत्वेकरून भावगीतात्मक आहे. या भावगीतांतून कुठे कुठे पूर्वसूरींचे व समकालीनांचे सूर अस्पष्टपणे ऐकू येतात, परंतु ते इतक्या अस्पष्टपणे ऐकू येत असतात की, त्यांच्या प्रभावाखाली ही सुरवातीची कविता दबली गेली आहे असे मुळीसुद्धा वाटत नाही. 'फुलवात' नंतर प्रसिद्ध झालेल्या 'पेर्तेव्हा' या संग्रहातील सामाजिक कविता पाहून काही समीक्षकांनी अनिलांवरचा केशवसुतांचा प्रभाव स्पष्ट केला आहे. गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितांच्या छटाही कुणाला अनिलांमध्ये जाणवतात. घरामधे रममाण होणाऱ्या संसारी अनिलांचे रेव्हरंड टिळकांशीही (कुणास्तव कुणीतरी) नाते जोडता येईल आणि 'काव्य म्हणजे संगीतगर्भ विचार' असे म्हणून आपल्या गीतांचे स्वरलेखन करणाऱ्या अनिलांची तांबे यांच्या कवितेशी सोयरिक जमविता येईल! किंवा अनिलांच्या निसर्गप्रेमामागे बालकवींच्या प्रभावाचीही क्वचित कुणाला जाणीव होईल. परंतु हे सारे करण्याची मला आवश्यकताच वाटत नाही, कारण केशवसुतांच्या कवितेतील रांगडेपणाचा, गोविंदाग्रजांच्या कवितेतील शाब्दिक कल्पनाविलासाचा, तांब्यांच्या कवितेतील धृपदाला आवर्तित करण्याचा किंवा बालकवींच्या कवितेतील निसर्गोत्प्रेक्षेचा अनिलांमध्ये अभाव दिसतो. अनिलांची कविता ही सुरवातीपासूनच खास अनिलांची आहे. तिचा सूर तिला केव्हाच गवसला आहे. हा सूर त्यांनी कधी जीवनानुभवाशी विसंगत होऊ दिला नाही. वयोमानाप्रमाणे हा सूर अधिकाधिक खोल अशा मनोमंदिरातून आविष्कृत होत राहिला आहे.

गेल्या पन्नास वर्षांत मराठी कविता अनेक रूपे धारण करती झाली. तिच्या निष्ठावंत पाइकांवरही एकमेकांचा परिणाम घडत राहिला. नवकवितेच्या जमान्यात तर अनेकांची अवस्था केविलवाणी झाली. अनिलांचे तसे काही झाले नाही. त्यांची कविता त्यांच्या मार्गानेच जात राहिली.

मात्र सुरवातीपासूनच तिच्या मनाचा एक विशेष धर्म लक्षात येतो

आपल्याला आवडलेल्या एखाद्या पूर्वसूरीच्या कल्पनेची दुसरी एखादी हृद्य बाजू अविष्कृत करण्याचा त्यांच्या प्रतिभेला सोस आहे. ह्या कल्पनेचा अविष्कार अनिलांच्या कवितेत त्यांच्या अनुभूतींच्या संदर्भात एक नवाच अनुभव देऊन जातो. तो अनुभवीत असताना त्यामध्ये कधी कुठे ज्ञानेश्वर, तुकारामादी संतकवींची आठवण होईल, कुठे केशवसुत, गोविंदाग्रज यांच्या कल्पना डोकावल्याचा भास होईल, कुठे उर्दू गझला किंवा शायरीही आपली याद देऊन जाईल.

'फुलवात' नंतर प्रसिद्ध झालेल्या 'पेर्तेव्हा' या संग्रहाने व 'भग्नमूर्ति' व 'निर्वासित चिनी मुलास' या खंडकाव्याने काव्यक्षेत्रात बरेचसे वादळ उठविले. कारण या नंतरच्या कवितेमुळे काव्याच्या अंतरंगात आणि बहिरंगात अनिल जे प्रयोग करू पाहात होते त्यांचे स्वरूप त्या काळच्या वाचकाला नीट उमगलेच नाही. पस्तीस साली नागपूरला पेरिना-चमन ह्या प्रणयी जोडप्याने तत्कालीन सामाजिक विरोधावर मात करण्यासाठी आत्महत्या करून आपले एकमेकावरचे उत्कट प्रेम जाहीर केले. हे प्रणयी युगुल कुसुमावतीबाईंच्या आवडत्या विद्यार्थ्यांमध्ये मोडत होते. पेरिना-चमनच्या या आत्महत्येमुळे विद्ध झालेले कवीचे मन आविष्कारार्थ धडपडू लागले, त्यावेळी आपल्या मनातील खळबळ जुन्या पद्धतीच्या वृत्तबद्ध चरणकांतून व्यक्त होत नाही असा त्याला अनुभव आला आणि या नव्या अनुभवाचा आविष्कार एका नव्या मुक्त रचनेच्या रूपाने प्रगट झाला. पेरिना-चमनपेक्षाही प्रखर विरोध पचवून अनिल-कुसुमावती यांनी स्वत:चे जीवन फुलविले होते. त्यामुळे या मृत जोडप्याला उद्देशून आपल्या मनातील उत्कट प्रेमसाधनेच्या मागील तत्त्वज्ञानच कवी 'प्रेम आणि जीवन' या कवितेत बोलून गेला. ही भूमिका एकदा लक्षात आली की, येथे व्यक्त झालेले संबोधन किती स्वाभाविक वाटते !

> जगतांतच जीवन आहे, जीवनातच आहे आनंद
> येथें जगांतच जीवनानंद

हे स्वानुभवाचे, लाख मोलाचे बोल बोलून दाखविण्याचा त्याला येथे अधिकारच होता. म्हणूनच प्रीतीचे रडगाणे गाणाऱ्या तत्कालीन कवितेस,

‘ शाहीर आहे मी तेजस्वी गाणें
गाणारा, प्रीतीच्या आशावादाचा ! ’

हे सांगणे त्याला आवश्यक वाटले. जीवनानंद लुटण्याची, जीवन उपभोगण्याची मधुकर वृत्ती आणि प्रतिकूल परिस्थितीतही जीवनातला आशावाद टिकविण्याचा बाणा हाच अनिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायी-भाव. ह्या व्यक्तिमत्त्वापोटी अनिलांचे मन स्वत:मध्ये विश्वाची प्रचीती घेणारे आहे. त्यातूनच एक व्यापक सहानुभाव त्यांच्या कवितेत व्यक्त होतो. जीवनावर उत्कट प्रेम करण्यालाच आपल्या अवतीभवतीच्या जीवनाचे भान असते. अनिलांची सामाजिक कविता ही त्यांच्या प्रेमकविते-इतकीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित असल्यामुळे ती त्यांच्या प्रेम-कवितेशी अतिशय सुसंगत आहे.

‘ प्रेम आणि जीवन ’ मध्ये तरुण प्रेमिकांच्या आत्महत्येने व्यथित झालेले कवीचे मन जसे आहे तसेच त्या निमित्ताने सुचलेले जीवनविषयक विचारही आहेत. ही वैचारिक दृष्टी अधिक स्पष्टपणे अनिलांनी आपल्या ‘ भग्नमूर्ति ’ व ‘ निर्वासित चिनी मुलास ’ या खंडकाव्यातून आविष्कृत केली. ह्या जीवनविषयक विचारांचा स्रोत काव्यात यावा किंवा नाही, किंवा त्यासाठी कवीने स्वीकारलेल्या मुक्तछंदाचा परिणाम कितपत होतो, हाच तर त्या काळचा खरा वादाचा मुद्दा होता. परंतु हा वाद अनिलांच्या कवितेच्या संदर्भात आज अनाठायी वाटतो. अनिलांच्या या वैचारिक स्वरूपाच्या कवितांमागे कवीच्या आत्मकेंद्रित भावनेचा प्रबळ असा स्रोत आहे. मुक्तछंदातील लयबद्ध आंदोलने आणि भावनेला विचाराची दिलेली बैठक यांमुळे ही कविता, कविता म्हणून निश्चितच मनावर आघात करते.

अनिलांनी मुक्तछंदाचे प्रवर्तन केले तरी ह्या मुक्तछंदातून व्यक्त होणारा विचार आक्रस्ताळी स्वरूपाचा नाही. आक्रस्ताळेपणा, ऊरबडवेपणा

हा अनिलांच्या कवितेतच कुठे वसत नाही. त्यांच्या कवितेचे वहिरंग हे संथलयीत सामावणारे आहे. त्यामुळे खोटा, उरवडवा आवेश त्यांच्या कवितेत कुठे येत नाही. अन्यायाविरुद्ध व्यक्त होणारी चीडही कुठे मुठी आवळून जल्लोष करीत नाही. त्यांच्या मनातला संताप हा संयत, समधात, शांत अशा सुसंस्कृत मनाचा संताप असतो आणि तो तसाच व्यक्तही होतो. 'प्रेम आणि जीवन' मध्ये एकीकडे आत्महत्येमुळे अस्वस्थ झालेला कवी आहे तर दुसरीकडे त्या अस्वस्थतेवर मात करण्यासाठी स्वत:ची जीवननिष्ठा आविष्कृत करण्याचा बाणा आहे. 'भग्नमूर्ति' मधे राम-टेकच्या भग्नमूर्तींच्या दर्शनाने व्यथित झालेला कवी, केवळ आपली व्यथाच मांडण्यामध्ये धन्यता मानीत नाही तर त्या व्यथेच्या संदर्भात संस्कृतीच्या, कलेच्या अंगोपांगांचा विचार करीत असतानाच राष्ट्राने अंगीकारावयाच्या विजिगीषु तत्त्वप्रणालीचेही संसूचन करतो. 'भग्नमूर्ती'च्या चित्रात्म अशा शब्दचित्राने तो एकीकडे मन भारून टाकतो तर दुसरीकडे तो त्या मूर्तींच्या उध्वस्ततेची कल्पना देऊन मनात विषादाची छटा उभी करतो. या पार्श्व-भूमीवर प्रगट होणारा विचार चिंतनशील मनाला कवीच्या प्रगल्भ वृत्तीची कल्पना देऊन जातो. युद्धाच्या भयाण आगीत होरपळून भेदरलेल्या एका निर्वासित चिनी मुलाचे केवळ एक चित्र पाहून कवीचे अंत:करण आक्रोशून उठते. अनिलांच्या अशा प्रकारच्या कवितेनंतर साम्यवादाच्या विचारसरणीने मराठीत निर्माण झालेल्या वैचारिक कवितेचे महत्त्व मान्य करूनही अनिलांच्या कवितेतील वैचारिकता ही खास त्यांच्या व्यक्तिमत्त्वा-तून साकारलेली आहे, हे आज लक्षात घेणे औचित्यपूर्ण वाटते.

जीवनविषयक श्रद्धा, उत्कटता, निष्ठा यांतूनच अनिलांची कविता उद्‌भूत होते. तिने परंपरेचे डोळस अवलोकन केले आहे आणि त्यातूनच स्वत:चे असे काही कविताविश्व निर्मिण्याचे तिने जणू व्रतच घेतले आहे.

आपल्या मुक्तछंदाच्या प्रवर्तनामुळे मराठी काव्यरचनेत क्रांतिकारक बदल घडवून आणणाऱ्या अनिलांनी मुक्तछंदाचे मूळ, परंपरेने चालत

आलेल्या जुन्या प्राचीनकाळच्या छंदविषयक प्रयोगात पाहिले आहे. कवीच्या सहजस्फूर्त आशयाशी आणि त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपाशी छंद आपोआपच निगडित होत असतो, हे लक्षात घेऊन त्यांनी छंदविषयक अनेक प्रयोग केले आहेत. आंदोलने हेच छंदाचे अंतिम लक्षण आहे, हा परंपरेतूनच उत्स्फूर्त झालेला विचार आहे. अनिलांच्या कवितेचे परंपरेशी असे दृढ नाते आहे आणि तरीही त्यांची कविता परंपरेत कुठे हरवून बसत नाही. तिची अशी स्वतंत्र, वेगळी परंतु परंपरेला अर्थपूर्णता प्राप्त करून देणारी चाल आहे.

ही चाल त्यांच्या 'पेर्तेव्हा' संग्रहातील कवितेने मनावर कोरली जाते. एकीकडे संसारात रमलेले तर एकीकडे अवतालीभवतालीच्या जागत्या जीवनाने जीवनाचा अर्थ आकळू पाहणारे असे कवीच्या मनाचे दुहेरी स्वरूप या संग्रहात सतत दिसते.

प्रीति तुझी माझी ही
  प्रीति तुझी माझी न

हा साक्षात्कार याच काळातला. म्हणूनच

प्रीति तुझी माझी
  नाही निराळेपणाची
जगातल्या सुखदु:खीं
  मिळालेपणाची !!

ही भावना त्यांच्या मनाच्या गाभाऱ्यात ठसत राहते. महायुद्धाच्या सावटाने घायाळ झालेल्या मनाचे कोपरे 'झळ' या कवितेत ते अतिशय परिणामकारकतेने व्यक्त करतात.

किती दूरचि लागे झळ
आतल्या जीवा
गाभ्यांतिल जीवन रस
सुकत ओलावा
केळीचे सुकले बाग

ह्या कल्पनेतील अर्थव्यंजकता एकदम मनाचा ठाव घेते.

अशा अत्यंत सूचक व अर्थव्यंजक भावगीतांबरोबरच 'सुप्त ज्वालामुखी', 'मानवता', 'बंड' इत्यादी सामाजिक क्रांतीची चाहूल व्यक्त करणाऱ्या वैचारिक स्वरूपाच्या कविता 'पेर्तेव्हा' संग्रहामध्ये लक्ष वेधून घेतात. परंतु रसिक वाचकाचे मन घोटाळत राहते ते 'धुंवारी', 'शर्वरिणी', 'पहाट', 'उद्या' या भावकोवळ्या प्रेमगीतांमध्येच. या प्रेमगीतांनी एका पिढीची प्रेमभावना उल्हसित केली आहे. 'पेर्तेव्हा' संग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर त्या काळच्या काव्यवेड्या रसिकांनी या प्रेमगीतांच्या साहाय्याने आपल्या भावना वेळोवेळी व्यक्त केल्या आहेत !

निसर्गावलोकन, जीवनचिंतन आणि उत्कट भावजीवन यांच्या संगमातून निर्माण झालेल्या कवितांतील परिणामकारकता किती उंचीवर जाऊ शकते हे या संग्रहातील 'धडकी' व 'पेर्तेव्हा' या दोन कवितांवरून लक्षात येऊ शकेल. जवळ येत असलेला पावसाळा कोसळलाच नाही तर . या कल्पनेची धडकी कवीने आवेशपूर्ण कल्पनाचित्रांच्या माध्यमातून मनापर्यंत पोचविली आहे आणि 'पेर्तेव्हा' या कवितेतून निसर्गाचे चैतन्यशाली 'कवतिक' साक्षात उभे केले आहे. निसर्गातील अत्यंत सूक्ष्म अशी स्पंदने या कवितांतून अनिलांनी पकडलेली आहेत.

'चिरयौवनते'चे वरदान घेऊन कवी जन्माला आला आहे. जीवनातील अवतीभवतीच्या उषानिशेचे त्याला सतत भान आहे. निसर्गचारुता आणि

मानवी प्रयत्न यांनी त्याच्या वृत्ती सदैव उचंबळून येत आहेत आणि हे जीवन कितीही उपभोगले तरी 'सदा अतृप्त मी' असे म्हणणारा कवी जीवनाचे पात्र उत्कंठेने भरतो आहे, हे अनिलांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्र लक्षात घेतले की, वैचारिकतेला काव्यमयता प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत का येते याचे अधिक स्पष्टीकरण करीत बसण्याची आवश्यकता राहत नाही. 'मला आवडते वाट वळणाची' या शब्दांत नावीन्याचा आपला सोस त्याने व्यक्त केलाच आहे.

'पेर्तेव्हा' नंतर अनिलांच्या 'सांगाती'मधील कवितेकडे आपण येतो आणि एकेक कविता वाचून आपण अगदी थक्क होऊन जातो. '१९४७' किंवा 'पाहतों हें सर्व आम्ही'सारखी वैचारिक स्वरूपाची कविता सोडल्यास येथे अनिलांची कविता केवळ संवेदनांचीच भाषा बोलू लागलेली दिसते. 'हातीं हात धरून चालविणारा कोण तूं ?' या शब्दांत आपल्या संस्कृतीत मुरलेल्या कर्मविपाकाच्या, दैवाधीनतेच्या, अगतिकतेच्या कल्पनेचा मनाला होणारा काच व्यक्त झाला आहे, 'आज अंधारी रात'मध्ये मनाची विषण्ण अवस्था निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने व्यक्त होत आहे तरीही .

अंतरंगीं त्यांतहि पण
ओळखीचा प्रकाश आहे

ही हृद्य भावना आहेच. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही बेहोषीने लिहिलेल्या इतर कवींच्या कवितांच्या शेजारी अनिलांची '१९४७' ही कविता ठेवली तर अनिलांच्या चिंतनशील, विचारप्रवण मनाचे महत्त्व लक्षात येते. सत्तेचाळीसने त्यांना आनंद न होता सत्तावनप्रमाणे वाया गेलेले घटित म्हणून ते बेचैन होतात. 'सारेच दीप कसे मंदावले आता' या कवितेत प्रकटलेला स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या स्थितिगतीचा विषादही असाच बेचैन करणारा आहे.

'रुसवा', 'गाठ', 'तहान', 'तटस्थ' या कविता वाचताना शब्दांचे भान हरपते आणि गहिऱ्या भावमयतेने मन भरून येते. तारुण्यसुलभ

## एकोणीस

प्रेमभावनेनंतर, प्रौढावस्थेतील प्रगल्भतेला आणि सूक्ष्म भावतरंगांना इथे स्पर्श झालेला दिसतो. ह्या कवितांतील प्रत्येक शब्द हा त्या कवितेच्या भावनेशी एकरूप होऊन गेला आहे असे वाटते. पन्नाशीनंतरच्या मनात अनिलांनी 'पर्यंत' मध्ये व्यक्त केलेले विचारच येत असतील काय ? तारुण्यसुलभ प्रणयाराधनाच्या अवस्थेत प्रियकराने व्यक्तविलेला,

हृदयींच्या अंधारांत
  लावियेली फुलवात
तुवां आपुल्यिये हातीं
  उजळली दिव्य ज्योती
कोनाकोनीं खुले कांती
  सरे जीवनाची भ्रांति

हा अनुभव जितका वास्तव तितकाच आल्हाददायक होता आणि आता वयाची पन्नाशी ओलांडल्यानंतर काढलेले,

निश्चित पुढची वाट असे ही
निश्चित आणिक अंत
गडे हो निश्चित आणिक अंत
मध्येच पण मी निघून जाईन
शोधायास दिगंत !
कुणी नका येऊं मजमागे
तिकडे नच पदपंथ
केवळ आहे अंतर तिकडे
नुसते भ्रांत अनंत !

हे उद्‌गारही, नव्या परिस्थितीत तितकेच वास्तव आहेत परंतु ते आता मात्र मन ढवळून काढणारे आहेत.

अनिलांच्या कवितेचा असा हा प्रवास जीवनानुगामी आहे. आत्मानुभूतीच्या स्पर्शाचे कोंब त्यात फुटलेले असल्याने तो खराखुरा तुमचा-आमचाच आहे. परंतु तुमच्याआमच्या किंवा आमच्यापैकी अनेकांच्या अनुभवांना अनिलांच्या उत्कट प्रेमजीवनाचा भोग मिळालेला नसतो हेही तितकेच खरे ! या बाबतीत अनिल मोठे भाग्यवान खरे. त्यांच्या शांत, सुशीतल, तृप्त प्रेमजीवनाचा अनेकांना हेवा वाटत आला आहे. त्या जीवनाची अनुभूती देणारी कविता म्हणून त्यांची ही सारी कविता केव्हाही मराठी कवितेत आगळीच ठरेल यात शंका नाही. या उत्कट प्रेमसाधनेमुळेच कुसुमावतीबाईंच्या मृत्यूचा थांगपत्ता कवीला अगोदरच लागला होता काय ? त्यांच्या मृत्यूपूर्वी दोन महिने अगोदर लिहिलेल्या 'एकाकी' या कवितेचा दुसरा अर्थच संभवत नाही.

'श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशी', 'आई' या दोन कविता अनिलांच्या श्रद्धांचा परिचय करून द्यावयास पुरेशा आहेत. विशेषतः वयाच्या ५९ व्या वर्षी 'आई'वर लिहिलेल्या कवितेतील वेगळेपणा मराठीतल्या 'आई' विषयक कवितांच्या संदर्भात जाणवल्याखेरीज राहत नाही. 'आई'च्या मृत्यूने कवीच्या मनातील पुत्रत्व जसे जागे झाले आणि त्याची कृतज्ञता व्यक्त झाली, तसेच पुत्राच्या–किशोरच्या–मृत्यूने व्यथित झालेले पित्याचे अंतःकरणही 'अंत'मध्ये व्यक्त झाले आहे. तेथे पित्याच्या कृतकृत्यतेचे अश्रु वाचकांच्या डोळ्यात तरळत ठेवण्याचे सामर्थ्य आहे.

किशोरच्या मृत्युनंतर अनिलांच्या काव्यलेखनावर परिणाम होणे साहजिकच होते परंतु तरीही त्यांची भावना मूक झाली नाही. पीक, कोंबडा, रभागर्भ या नंतरच्या कवितांनी अनिलांनी पुन्हा कात टाकली आहे, याची जाणीव झाली. विशेषत गेल्या दहा पंधरा वर्षांत त्यांनी केलेली 'दशपदी' काव्यरचना एक नवे सामर्थ्य घेऊन अवतरली आहे. ह्या दशपद्यांतून कवितेतला आकृतिबंध श्रेष्ठ कवीमध्ये किती बंदिस्त असू शकतो यांची जाणीव होते. ही दशपदीही त्यांनी केवळ चूष म्हणून

नावीन्याच्या हव्यासाने आणलेली नाही. तिचे प्राचीनकाळच्या द्विपदी, चतुष्पदी किंवा जयदेवाच्या अष्टपदीशी रचनेच्या दृष्टीने कुठेतरी नाते आहे. सुनीत हे एका अर्थाने चतुर्दशक होते, परंतु त्याची प्रेरणा पाश्चात्त्य वाङ्मयात होती. अनिलांनी दशपदीच्या रूपाने पुन्हा एकदा परंपरेशी वारसा जोडला आहे आणि ज्या दशपद्या लिहिल्या आहेत त्या इतक्या मार्मिक व चैतन्यशील आहेत की, अत्याधुनिक मराठी कवितेतील सारी सूक्ष्मता, अर्थव्यंजकता व्यक्त करण्याचे त्यांनी श्रेय पटकावले आहे.

कुसुमावतीबाईंचा मृत्यू हा अनिलांवरचा मोठाच आघात. परंतु अनिलां-सारखा जीवनस्पर्शी कवी त्यामुळे घायाळ झाला तरी त्याच्या जीवनोन्मुख वृत्तीमुळे विकल, विफल झाला नाही. म्हणूनच तो 'उशीराचा पाऊस' किंवा 'काळी' सारखी कविता तितक्याच तन्मयतेने लिहू शकतो. पाट-घड्यावर बसवून पावसाशी कोडकौतुकाचा खेळ खेळावा, ही जीवनदायी वृत्ती अनिलांत अजूनही रसरशीत आहे. अनिलांसारख्या कवींना चिर-यौवनाचे प्राप्त झालेले वरदान असे सारखे उफाळून येत असते. अनि-लांच्या कवितेचे प्रतीक म्हणून 'चिरयौवन' या कवितेकडे निर्देश करण्यात येत असतो आणि ते बरोबर आहे, परंतु त्यांची 'काळी' ही कविता मी वाचली आणि माझ्या मनात दुसराच एक विचार तरळून गेला. 'काळी' कवितेतील रूपकात्मता आणि विदर्भाच्या काळीचे (Black cotton soil) अंतरंग उलगडता उलगडता कवीने स्वतःचेच अंतरंग उलगडले आहे, असे मला वाटू लागले. 'काळी' हे अनिलांच्या कवितेचे खरे प्रतीकात्मक स्वरूप होय.

सत्तरी ओलांडलेल्या अनिलांच्या हातून अजूनही अशाच काही चांगल्या कविता मिळत राहतील हे खरे, परतु त्याच्या सत्तरीच्या निमि-त्ताने प्रसिद्ध होत असलेल्या या संग्रहातील कविता वाचून अनिल मात्र खूपच समजल्यासारखे वाटतात. त्यांनी थोडे लिहिले आहे, नवकाव्याच्या जमान्यात ते कुठे बसतात इत्यादी विचारांना आता फारसे महत्त्व

देण्याचे कारण नाही. त्यांनीच ‘झालें’ नावाच्या कवितेमध्ये पाच वर्षां-पूर्वीच म्हणून ठेविले आहे :

मी थोड्याच कविता लिहिल्या तर कुठे काय थोडें झालें ?
इतक्याच लिहिल्या गेल्या हातून हेंच काय थोडें झालें !
खूप लिहिल्या असल्या तर असते काय खूप झालें ?
कुणी कधी म्हटलें असतें, पुढे काय ? खूप झालें !
चार दोन आवडत राहतील हेंहि काय कमी झालें ?
बाकीच्यांत शोधत रहाल त्यांत काय कमी झालें !
होऊन गेले थोर कवी त्यांचें काय पुढें झालें ?
तेंच माझें आज आहे असतें जें काय पुढें झालें !
कधी सहज दाद दिलीत एवढें मात्र बरें झालें
तुमचें आमचें नातें निदान तेवढ्यापुरतें खरें झालें !

कालच्या तरुण पिढीने त्यांना साद दिली, आजची दाद देत आहे व उद्याचीही देत राहील.

तेवढे सामर्थ्य त्यांच्यात निश्चितच आहे.

सप्टेंबर १९७१

भीमराव कुलकर्णी

# चिरयौवन

# चिरयौवन

फिरून वर्षचक्र हें पुढें पुढेंच जातसे
विशी तिशी नि चाळिसीहि लोटली जरी दिसे
असे तरीहि गोठली न जीवनांतली उषा
तशाच रंगसंगतीहि वृत्ति गुंगती तशा

अजून ऊन रक्त हें भरे नसानसांतुनी
तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारुनी
विरक्ति ? छे ! सदानुरक्ति ! भक्ति ! प्रेमभक्त मी
तरंग ऊर्मि प्रीतिच्या अजून यौवनांत मी ! !

अजून यौवनांत मी नि दंग जीवनांत या
प्रसादही प्रमादही प्रमोद आणखी दया
विचार आणखी विकार भावनांत पाझरे
मधू न त्यांतला सरे म्हणे न मीहि त्या पुरे

अरे कशास जीवना विचार आणसी मना
उदंड पाज आजची उद्याचि तीहि आणना
पुरें भरावयास पात्र हें नको करूं कमी
तिथें सदा अतृप्त मी अजून यौवनांत मी ! !

अजून यौवनांत मी मुलें फुलें सभोंवतीं
विकासती विलासती हसून हासवीत तीं
प्रलोभनांत प्रीतिच्या कुणी हसे झुरे जिथें
तिथें सखे नि सोबती कुणी इथें कुणी तिथें

प्रसन्न चित्त हासतें बघूनिया मजेस त्या
मुलांत मूल होत मी फुलांत भृंग होत त्या
भरीत रंग बैठकींत स्नेह सोबतींत मी
प्रियेस प्रेम होत मी अजून यौवनांत मी

अजून यौवनांत मी जगांत जागत्या अशा
जगावयास गावया पहावया उषा निशा
इथें निसर्गचारुता इथें प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद घेउनी नवी

विवर्त भ्रांति भास हा अशा जगा म्हणो कुणी
मला इथेंच सत्य तें दिसे पटे क्षणोक्षणीं
विकासलेंच ब्रह्म हें, न जीव बंधनांत मी
नसे मुमुक्षु, मुक्त मी अजून यौवनांत मी !

# प्रेमाचें ममत्व

तिच्या मार्गी तुम्ही कुसुमशत नेवोनि पसरा
कुठेंही त्या माजीं मम सुमन द्या फेंकुनि जरा

तयां पुष्पां साऱ्या त्यजिल, असलीं सुंदर जरी
सखी माझें साधें सुमनचि त्वरें घेइल करीं १

तिला काव्यें तुम्ही अगणित लिहा, नेउनि वहा
तया काव्यांची ती कधि न हृदयी दाविल स्पृहा

परंतू माझें मी जरि रचिन निःशब्द कवन
तरी शब्दांमध्यें करिल नित ती तेंच पठन २

तुम्ही सारे यत्ना तिजप्रत करा जा रमविण्या
विनोदें, कौशल्यें, कितिकहि झटा जा हंसविण्या

परी माझ्या चर्येवरि न दिसलें तें स्मित जरी
प्रमोदा सोडोनी तरि त्वरित खिन्नत्वचि धरी ३

तुम्ही घेवोनी जा, तिज रुचिर सौंदर्य बघण्या
निसर्गाचें कोठें, उपवनिं, तडागीं विहरण्या

मला तुम्ही न्याया जरि तिजसवें कीं विसरला
उदासीना वृत्ती करिल, गणुनी तुच्छ सकलां ४

तिला द्या नेवोनी अखिल दुनिया दौलत तुम्ही
हिऱ्यांचे, मोत्यांचे निचय उघडा जाउनि तुम्ही

तयांमध्यें टाका मम फुटकिही शिंपचि कुणी
धनातें सोडोनी, उचलिल सखी तीप्रति झणीं ५

तुम्ही दृष्टी ठेवा अविरत तिच्या नेत्रि खिळली
म्हणा त्रासे, आम्हांवरि नच कधि दृष्टि वळली

परी जेव्हां जेव्हां नयन वळती हे तिजकडे
तिचें माझ्या नेत्रां क्षणभर तरी मीलन घडे ६

तुम्ही सारे मोठे किति जरि गुणें युक्त असलां
तुम्ही सारे रूपें जरि मदनमूर्तीच असलां

कृपादृष्टी तुम्हावरि जरि किती लक्ष्मि करिते
अभावीं सर्वांच्या मज मम सखी प्रेम वरिते ७

# शोध

शोधुं नको मज नीलाकाशीं
ग्रहगण नक्षत्रांच्या पाशीं

रम्य उषेच्या तेजामधिं वा
शोध तुला कैसा लागावा ?

संध्यासमयीं पक्षि परतती
कशास बघसी ? तेथ नसें मी

स्वैर वायुच्या चंचल लीला
ओळख देति न माझी तुजला

कशास ऐकसि ? निर्झर गाती
शब्द न माझे तयांत निघती

नाचती थवे मृदु कमलांचे
तयांसवें मम हृदय न नाचे

शोधसि मज विश्वांत कशाला
उगिच जिवाला शिणवायाला ?

विश्वि नसें मी आतां उरलों
तुझ्याच हृदयीं विरलों, सरलों

तव हृदयानें विश्व रचावें
तिथेंच मी स्वच्छंद रमावें

रचशिल विश्व जरी शब्दांचें
गीत तुझ्या होइन हृदयाचें

भासांचें रचशील विश्व जरि
स्वप्न तिथें होईन मी तरी

करिशिल सृष्टि जरी चित्रांची
वृष्टि करिन तेथें रंगांची

कल्पनाजगीं जरि वसशिल तूं
कल्पनाच होइन तेथें मी

हृदयीं, हृदयींच्या विश्वीं वा
तिथेंच तूं मम शोध करावा

हृदय तुझें मज शोधत फिरतें
तयांसवें ममही अनुसरतें

खेळ कधीं हा मग संपावा ?
शोध तुला केव्हां लागावा ?

## आशागीत

हृदयिं तिमिर दाटला
प्रकाश सर्व आटला

दूर, दूर कितितरी
एक तारका परी

किरण एक प्रीतिचा
अजूनही पडे तिचा

किरण तोच मज परी
मार्ग दावि कितितरी !

हास्य सर्व लोपलें
मेघ मात्र पसरले

नीलिमा नभांतला
कधिंच काळवंडला

अजूनही परी तिथें
वीज चपल चमकते

हास्य तेंच मज परी
हांसवी कितीतरी !

मंदिरास लागली
आग सर्व पसरली

कळस कोसळे, पडे
नाश, नाश चहुंकडे

अजूनि मूर्ति आंतली
नसे मुळीहि भंगली

धरूनि हृदयिं ती परी
जगेन मी कितीतरि !

# सारंग

वेळ झाली भर माध्यान्ह
माथ्यावर तळपे ऊन
नको जाऊं कोमेजून
माझ्या प्रीतिच्या फुला रे

तप्त दिशा झाल्या चारी
भाजतसे सृष्टी सारी
कसा तरी जीव धरी
माझ्या प्रीतिच्या फुला रे

वाहतात वारे जळते
पोळतात फुलत्या तनुतें
चित्त इथें मम हळहळतें
माझ्या प्रीतिच्या फुला रे

माझी छाया माझ्याखालीं
तुजसाठीं आसावली
कशी करूं तुज सावली
माझ्या प्रीतिच्या फुला रे

दाटे दोन्ही डोळां पाणी
आटे नयनांतच सुकुनी

कसें घालुं तुज आणुनी
माझ्या प्रीतिच्या फुला रे

प्रीतिवरी विश्वासून
घडीभरी सोसूं ऊन
नको टाकुं खालीं मान
माझ्या प्रीतिच्या फुला रे

मृगजळाच्या तरंगांत
नभाच्या निळ्या रंगांत
चल रंगूं सारंगांत
माझ्या प्रीतिच्या फुला रे

# सायंतारा

गगनिं उगवला सायंतारा
मंद सुशीतल वाहत वारा
हांक तुझी मज स्पष्ट ऐकुं ये
येइ सखे, ये बैस जवळि, ये
घाल गळां मम तव कर कोमल
पसरूं दे श्वासाचा परिमल
घेई मम हृदयांत निवारा
गगनिं उगवला सायंतारा !

बस जवळ ये, बघ ही पश्चिम
कोमल रंगीं खुलली अनुपम
ये नेत्रीं ते घेउं सांठवुनि
गालावरती गाल ठेवुनी
उदासीनता विसर जगाची
तुझाच मी, तूं माझि सदाची
विरलें हृदयांतरिं बघ अंतर
तूं आणिक मी जवळ निरंतर
सरे एकसरि भेदपसारा
गगनिं उगवला सायंतारा !

वाइम

# आळवणी

थकले रे डोळे माझे
वाट तुझी पाहतां
वाट तुझी पाहतां रे
रात्रंदिन जागतां

सुकला रे कंठ माझा
तुज आळवीतां
तुज आळवीतां रे
नाम तुझें जपतां

आटले रे अश्रु माझे
वाहतां वाहतां
वाहतां वाहतां रे
आठवणी काढतां

शिणला रे जीव माझा
तुजविणें राहता
तुजविणें राहतां रे
तुज नच भेटतां

# फुलवात

(हृदयींच्या अंधारांत
लावियेली फुलवात

तुवां आपुलिये हातीं
उजळली दिव्य ज्योती)

कोनाकोनीं खुले कांती
सरे जीवनाची भ्रांति

तेज पसरे प्रशांत
हृदयींच्या मंदिरांत

अनन्ताचें द्वार खुलें
सान्तामधूनीयां झालें

तमांतुनी ये प्रकाश
व्यापी हृदय–आकाश

मूर्तिमधूनी प्रचीती
अमूर्ताची होई चित्तीं

फुटे शब्द नि:शब्दाला
हृदयींच्या जिव्हाळ्याला

हृदयींच्या मंदिरांत
लावियेली फुलवात

# पावसाळा

बाई या पावसानं
        लाविली झीम झीम
भिजलीं हीं माळरानं
        उदासलं मन
        बाई या पावसानं

दिनभर देई ठाणं
        रात्रिस बरसून
सकाळिचं लोपविलं
        कोवळं ऊन छान
        बाई या पावसानं

फुलली ही जाईजुइ
        बहरून वाया जाई
पारिजातकाची बाई
        कशी केली दैन
        मातींत पखरण

थबथबलेलीं पानं
        ठिबकती वरतून
पाखरांचे भिजवून
        टाकिले पंख छान
        बाई या पावसानं

नदीनाले एक झाले
पूर भरूनीया चाले
जिवलग कोठें बाई
पडे अडकून
नच पडे चैन

बाई या पावसानं
लाविली झीम झीम

## हाक

दुरुन तुझी हाक मला नित्य ऐकुं ये
सागराच्या त्या अफाटांतुनी
सीमेवरुनी वा क्षितिजाच्या
अवकाशाच्या पलीकडुनी
अंतराळांतुनी अंतरंगाच्या
कुठुन तरी हाक एक पुसट ऐकुं ये

ऐकतांच ती हाक दूरची
चित्त बावरे थरारे अंग
कोठें येऊं मी कां बोलाविसी
कोठुनी मला पाहसी सांग
जिथें न पोचते दिव्याची माझिया प्रभा
दडुन तिथें राहिलास का तूं उभा

फोडिला दीप फेकून दिला
मिळून गेली ज्योत मातीला
अंधारांतच शोधीत तुला
अंधारांतच भेट ये मला
मिळेन येऊनी तुला कधीं तरी असा
फिरून हाक ऐकुं येत देत भरवसा
हाक तीच स्पष्ट अतां जवळ ऐकुं ये !

# झाला अंधार बाहेर

झाला अंधार बाहेर
आतां येई ना घरांत
घरांतल्या दीपाच्या ह्या
मंद प्रकाशांत
आतां येई ना घरांत

संध्याचित्राची सोनेरी
रंगकळा जात जात
क्षितिजाची रेघ मात्र
उरे काळोखांत
आतां येई ना घरांत

आज नाहीं दिसायाच्या
तारा तुला आकाशांत
बघ सर पावसाची
आली क्षणार्धांत
आतां येई ना घरांत

कधींची टाकुनी दिली
सतार त्या कोपऱ्यांत
आज घेऊं वाजवाया
हृदय संगीत
आतां येई ना घरांत

बसू शेजारीं शेजारी
अभ्यंतरीं आपल्याच
आपल्याच डोळीं पाहूं
चित्रे आपलींच
आतां येई ना घरांत

# घराकडे जातां

दिवसाचे सारे
श्रम संपवून
थकून भागून
घराकडे जातां
घराकडे जातां--घराकडे येतां--

वाट ही संपली
घर दिसूं आलें
माझें चित्त खुलें
दुरूनी पाहतां
घराकडे येतां--घरापाशीं येतां--

चिमुकलें घर
फुलें जागोजाग
छोटिशीच बाग
डोले आनंदांत
घरापाशीं येतां--घराशीं पोंचतां--

बाळ लडिवाळ
खेळे अंगणांत
आलाच धावत
कडेखांदीं घेतां
घराशीं पोंचतां--घरांत शिरतां--

लागली चाहूल
माझ्या पावलांची
धांदल कुणाची
किती उडे आतां
घरांत शिरतां--घरामधें जातां--

कानीं शब्द येती
'आले हं ही आलें'
धावली पाऊलें
हसऱ्या स्वागता
घरामधें जातां--घरांत वसतां--

स्वतःच्या हातचा
गोड अल्पाहार
श्र म प रि हा र
बोलतां बोलतां
घरांत बसतां--घरीं विसावतां--

आम्ही दोघेजण
आमचा हा बाळ
सुखे जाई काळ
हासतां खेळतां
घरीं विसावता--घरीं आनंदतां

झाली संध्याकाळ
लागे सांजवात
बाळ म्हणे गीत
बोबड्या शब्दांत
घरीं आनंदतां--घरांत रंगतां--

एखादी कविता
साधें गोड गीत
म्हणू सुस्वरात
अंधार पडतां
घरांत रंगतां -- ज-ग वि-स-र-तां !

# गरीब आणि पावसाळा

इकडे पाणी, तिकडे पाणी, वरखालीं पाणी पाणी
दीनवाणि झोपडी कशीतरि तग धरुनी केविलवाणी
उघडी पोरें–गोजिरवाणीं–भिरभिर भेदरल्या नयनीं
दारामध्यें उभीं विलगुनी कुडकुडल्या चिमण्यावाणी
ढोरवासरें अंग चोरुनी खटुनि वळचणिच्या खालीं
डोळे मिटुनी उभीं तशांतच अंगें झाडित भिजलेलीं
मायलेकरें आंत झोपडित तुटलेल्या बाजेवरतीं
माय भिजे, परि बाळ निजे क्षण आईच्या अंकावरतीं
कोपऱ्यांत घरधनी फुंकितो चुलींतलें इंधन ओलें
जाळ होईना इकडे म्हणती भूक भूक पोरेंबाळें
कंटाळुन बाहेर येउनी क्षणभर पाही आभाळ
घोर पडे जीवास कसा करूं रात्रिस यांचा संभाळ
हात जोडुनी आभाळाला गहिंवरुनी मग बोलतसे
" देवा किरपा करा अतांतरि ऊन पडूं द्या थोडेंसें
मागिल वरसा कसा काढला कठिण कोरडा दूकाळ
अंवदा वर पाडता कशाला तसाच हा ओला काळ "

वीज चमकली, निसर्ग हसलें, गडगडाट वर मेघांचा
उपहासाचें हास्य करित ये पाउस पुनरपि जोराचा !

# प्रेम आणि जीवन

कां रे कंटाळलां जगतास या
प्रकाश पहिला जेथें पाहिला
जेथें रांगलां, दुडदुडलां
आणि वाढलां
जेथील सौंदर्य आणि आकाश
पाहून हृदय विकास झाला
प्रेमसुख जेथें तुम्हां मिळालें ?
असेल जगांत बरें वाईट
म्हणत मी नाहीं सारें चांगलें
बरें ते वाढवा, वाईट घालवा
पण जगांतच योग्य राहणें
जगतांतच जीवन आहे, जीवनांतच आहे आनंद
येथें जगांतच जीवनानंद

पाहा बरें जरा, चारी बाजूला
जीवनार्थ धडपड चालली
निव्वळ जीवन आनंद वाटे
असे आहेत किती जगतीं ?
उत्तरध्रुवाच्या प्रदेशीं पाहा
अर्ध्या वर्षाची रात्र असते
काळ्याकुट्ट त्या अंधारांतच
हिमवर्षाव !

चराचरहि गोठून जातें
वाहातो तशांत तुफानवारा
नाहीं निवारा
पिके न कांहीं
तेथेंही नांदती मनुष्यप्राणी
--आणखी, सुखानें !
इतुका आनंद जीवनीं आहे !

दूर कशाला ? उभे राहा जरा
पुतळीघराच्या मोठ्या दाराशीं
जेव्हां सुट्टी होते, तेव्हां नीट पाहा
एकेक कशीं माणसें येती
थकली भागली पाहा ती बाई
दहा तास पुरे काम करूनीं
बाहेर येते खिन्न मुखानें
खिन्नतेंत आहे मुग्धपणें त्या
मलूल चेहेऱ्यावरतीं हांसें
तिच्या घरीं आहे बाळ तान्हुलें
भेटेल आतां घरीं जातांच
उल्हास तोच चमके मुखीं
त्याच्यासाठींच कष्ट करतां
(कष्टांदु:खांतच जीव धरतां
जीवनाचा हेतु तिजसी आहे)
अशा कष्टांतही जगतसे ती
जणूं निश्चयेंच सुखी होण्याच्या

इतुक्या विरुद्ध परिस्थितींत
आपुल्या जीवास फार जपतें
इतुका आनंद जीवनीं आहे !

लहानसें तें फुलपांखरूं
पडून राहातें कोशामध्येंच
अंधारांतच जीव कंठितें, कष्ट भोगतें
वाट पाहात सान पंखांची
इतुका आनंद जीवनी आहे !

कसा वसंताच्या वावटळींत
शुष्क वाळला पाला पाचोळा
नाचतो, फिरतो, गिरगिरतो
प्रेम–फुगडीचे फेर धरतो
उंच उंच जातां डोलू लागतो
इतुकें जीवन प्रेमांत आहे !
इतुका आनंद जीवनीं आहे ! !

प्रेमानंद आणि जीवनानंद सोडोनि असा
मृत्युमुखीं तुम्हीं घेतली उडी !
प्रीतीचें वैभव तुम्हास होतें
किती आनंद जीवनीं होता !
सारेंच होतें, सर्वस्व होतें !
'जीवनानें त्या एकादिलाच्या
लढा जगताच्या विषमतेशीं'
हाच संदेश तुम्हांस होता !

प्रणयी जीवांनो ! गेल्यावर जीव
ऐकवितों तुम्हां निष्फळ बोल
आहेत कारण अनुभवाचे
माझ्या प्रतीतीचे !
कारण नाहीं मी प्रीतिशाहीर
प्रीतीचें रडगाणें गाणारा
शाहीर आहें मी तेजस्वी गाणें
गाणारा, प्रीतीच्या आशावादाचा

पेरीना ! चमन
कशासाठीं बरें असे दिले तुम्ही आपुले प्राण !
गेलांत सोडून जगतास या
कोठें अंधारांत ?
तेथून तुम्हां कोणीही परत आणूं न शके !
मंत्र सारे तेथे पडती फिके !
आणि माझें गाणें आशावादाचें ! !
हळहळूनी अश्रु टाकतों
तुमच्या विभक्त समाधीवरी
" हाय हाय ! ज्या एकदा गेल्या कळ्या मिटल्या
पुन्हा कां कधी जगी फुलल्या ! ! "

# सुप्त ज्वालामुखी

दुनियेंतल्या भाग्यवंतांनो
लक्ष्मीपुत्रांनो, सत्ताधीशांनो
तत्त्वज्ञानी आणि लेखक कवींनो
लोकनायकांनो ! येथें थांबा जरा !

संध्याकाळचे हवा खाण्यास
गाडीघोड्यांतून अथवा पायीं
फिरायास जातां ह्याच रस्त्यानें
नाकास पदर खुशाल लावा
पण नका करूं डोळेही बंद !

आहेच पाहीली येथील वस्ती
येथील झोपड्या येथील लोक
असेल कधीं विचारही केला
गलिच्छतेंत कसे राहाती, कसे जगती
स्वतांचे कसें पोट भरती
आणि पोरें बाळें कशीं पोशीती
वाटली असेल तेव्हां करुणा
दया आणखी सहानुभूती
हृदय हाललें असेल थोडें !

घरीं पोचता सुख समाधानें
समजाविलें असेल स्वतांला
आहेच चाललें आमचें कार्य

ग्रामोद्धाराचें लोकशिक्षणाचें
सुधारण्याचें सर्व तऱ्हेनीं,
आणि हळूहळू करीतच आहों
प्रगति ह्यांची सर्व बाजूंनीं
देतोच आहोंत सर्व मदत
कोणी पैशाची, कोणी कार्याची,
कोणी कशाची
आहे शक्य ज्यास त्या त्या प्रकारें !

अरे ! अरे ! पण मुळांतच हें चुकतें सारें
वर वर बरें जरी दिसतें
म्हणून म्हणतों थांबा येथें जरा !

कडेच्याच ह्या झोपडीपाशीं
आहे बाई उभी, पाठीशीं पोर
चार महिन्यांचें बांधलें दिसे,
पुढें उभी आहे मुलगी तिची
सहा वर्षांची
धुळीत खेळती मधली दोन
घरांत आहे फणफणला
घरधनी तिचा हिंवतापानें
होता चांगला धडधाकट
खेड्यांतला पिंड वाढला
येऊन राहिला शहरांत पण
पोटासाठीं आणि खंगून गेला

सुखी हें कुटुंब मुळांत होतें शेतकऱ्यांचें
होतीं ह्यांचींही दोन वावरें
स्वतांचें घर
सालोसाल पण नापिकी होता
कर्ज वाढलें सारेंच गेलें
शेतकऱ्याचा मजूर झाला
शहरांत काम शोधूं लागला
पण मिळणें आहे का सोपें ?
जंगलांत जाई विळा घेऊन
गवताचा मोठा भारा आणून
विकून मिळवी अर्धी भाकरी !

अशांतच झाला त्याला आजार
त्याची बाईल त्याची मुलगी
कसें बसें तेंच काम करूनी
दोन चार आणे मिळवितात
आणतात दाणादुणा घराला
नाहींत करीत कोणी याचना !

सांगा बरें ह्यांना काय पाहिजे
तुमची दया ? आणि करुणा
नको तयांना दया करुणा
दया कोणास ? दुबळ्यासाठीं अपगासाठीं !
करी मानवांना मानहीन जो
असा दयाधर्म काय कामाचा !

आहेत हे सारे धडधाकट
नाहीत आळशी परी कष्टाळू
तुम्ही उपकार कराया येतां
अपकार मात्र त्यांना करतां
आपलींच मनें शोधून पाहा
उपकार तुम्ही ज्यास म्हणतां
तुमचाच आहे बडेजाव तो !
त्यांच्यापासूनच घेतलें द्रव्य
थोडेसें त्यांतलें तयांस देतां
पुन्हा दडपण्या त्यांना ओझ्याखालीं !

अरे ! जी तुम्ही ही स्थिति निर्मिली
मुळांतच ती आहे चुकली
जेथें माणसा काम न मिळे
काम करतांही पोटापुरतें मिळे न मोल
आहे तो समाज मतलब्यांचा
परपुष्टांचा नफ्फेबाजाचा !
रक्तशोषक जळवांचाच !

एकदोन नाहीं हजारों लाख
आहेत माणसें अशीं भुकेलीं अशीं गांजली
त्यांचाच आहे जनसमुदाय
प्रचंड पर्वत-- !
तुम्ही आहां हिरवळ वरची

फुलझाडे, बहरलेले वृक्ष
वाटतें तुम्हांस छाया करतों, शोभा आणतों
आपणच त्या पर्वतालागीं--- !
पण पाहा आतां होऊं लागले
धरणीकंप
येऊं लागले दुरून ध्वनी
पृथ्वीच्या अथांग उदरांतुनी
उकळत आहे आंत तप्तरस !
वरतीं सुंदर फुललेल्यांनो
ध्यानात ठेवा ! आहे खालतीं
सुप्त ज्वालामुखी ! !

# भग्नमूर्ति

भग्नमूर्ति – ! आणि भग्नमंदिर
समोरच आहे तिचें पडकें
अवघे चारच पाषाणस्तंभ

आहेत उभे
साक्ष द्यावया गतवैभवाची ! !
भव्य प्राकार उंच गोपुर
सोनेरी कळस—कांहीच नाही !
पाडिलें, पडून उध्वस्त झालें
वाहून गेलें कालप्रवाहांत
कोठे नाही त्याचा मागमूसहि
आज दिसती जे चार स्तंभ हे
विखरले होते आजूबाजूंना
मेळवून त्यांना यत्नेंसायासें
पाहून तेथील जीर्ण अवशेष
त्यावर आहेत उभे केलेले
आहे त्या स्थितींत सांभाळिलेले
कसें बसें वर छत देऊनी
आता चला थोडें जवळ जरा

निरखून पाहा सूक्ष्मपणाने
एकेक आहे हा पाषाणस्तंभ
तुमच्या कलेचें एक स्मारक !

—कसे म्हणू पण तया स्मारक !
तुमची अनास्था पाहून वाटे
योग्य म्हणणें हळहळून
तुमच्या कलेची जिवंत समाधि !
कारागिरीच्या ह्या पाषाणावरी
अरे आहे रे बुरा चढला, माजला शेवाळ !
आणि त्यांतच ! !
संभावित जे पातले येथे
सहल कराया, वनभोजना,
देवदर्शना, यात्रानिमित्तें
कोरूनी ठेविलीं आहेत त्यांनी आपुलीं नांवें !
—धन्य तयांची !
खासच राहील जगांत नांव
कलाविध्वंसक नृशंसांचें त्या !

आहेत काढीत कोने कोपरे
उपद्रवी लोक छिलून कोणी
म्हणती आहे हा रक्तपाषाण
उपयोगी फार —
याच्या चूर्णाने उजळा येतो चांदीसोन्याला !
म्हणवितां ना रे तुम्ही वारस
मिरासदार त्या भव्य संस्कृतीचे आणि कलेचे
जिचे आहेत हे भग्न अवशेष ?
ज्याने फिरवून जादूचा हात
ओबडधोबड पाषाणावरी
रम्य आकृती कोरून काढिल्या

अनामिक तो अज्ञात शिल्पी
तुमचाच ना पूर्वज होता ?
किती कौशल्याने आहे कोरला
स्तंभावर ह्या कमल–बंध
एकेक कोरून कोमळ दळ
उठवून दिलें सहस्रदळ

नाजूक गुंफण पाकळ्यांची आणि
खोदिली आहे चाऱ्ही बाजूंना

कमळ–कल्पना–विकास सारा
निरनिराळ्या आकृतींमध्ये
सुरम्य चित्रण !
वापरला आहे पाषाणच हा
समजून हस्तिदंत तयाला
अथवा शिसवी लाकूड जणूं !
अनामिक त्या कलावंताने
आपलें नाही ठेविलें नांव
होतो तरी त्याचा मनीं आंठव
कल्पनेंत उभी राहते मूर्ति !
येथेच कोठे तरुतळाशीं
बसून त्याने अतिकष्टाने
घडविला हा असे पाषाण
मनांत कल्पून पूर्ण स्वरूप
हळूहळू त्याला आकार दिला
आणि शेवटीं नाजूक घाव
हलक्या हातें टाकीने दिलें,

अशी पुरी केली रम्य कलाकृति
खपला असेल कित्येक मास !
उभारिलें जें मंदिर त्याने
त्यांतला आहे हा थोडासा भाग
आणखी येथे जोत्यावरती
कोरिल्या होत्या आकृती किती--
किन्नर, गंधर्व ऱ्हस्वबाहुक--
झालर लाविली होती मूर्तींची
अशा या सुंदर स्थलावरती
कलापूर्ण शिल्पकाम केलेलें
बांधून त्याने भव्य मंदिर
आंत स्थापिली सुरम्य मूर्ति
परमावधीच त्याच्या कलेची !
हर हर ! ! तीच पहा पुढती
छिन्नविच्छिन्न भग्न, खंडित
उभी करूनी आहे ठेविली
उघड्यावरी उन्हापावसांत !
आणि तुमच्या अनास्थेने ती
आणखी खंडित होतच आहे ! !

अरे ! ज्या अज्ञात कलावंतांनी
रात्रंदिन अव्याहत खपूनी
तुमच्या उज्ज्वल संस्कृतीलागी
लेणें दिलें होतें बहुमोल हें
असतील त्यांच्या अस्थिहि जरी
कण-कण कोठे अंबाळ्यामधे

१५३५ भग्नमूर्ति

त्याहि असतील सळसळल्या
उद्वेगाने, जेव्हा येथे जाहला
विध्वंस त्यांच्या कलाकृतींचा !

अमोल त्यांचें हें संस्कृति–दान
दिलें होतें त्यांनी सांभाळावया
आगामी पिढीला
फेडायाचें होतें त्यांचें तें दान, ऋण समजून,
त्यांच्यापासूनच स्फूर्ति घेऊन.
दुर्दैवाने त्यांच्या आणि आपुल्या
कांहीच न झालें असे यांतलें
पूर्वजांनी नाही सांभाळ केला
जाहला उच्छेद त्यांच्याच वेळीं
आणि आता काय ?
आपुलें तर पुरतें वाजलें आहे दिवाळें !
ऋण फेडायाची गोष्ट कशाला ?
नका करूं वर अवमानहि
इतुकीच आहे त्यांची अपेक्षा
अनामिक त्या कलावंतांची !

कधीचाच झाला भाग्यरवि–अस्त !
पश्चिमसागरीं मारिली त्याने
कधीची बुडी !
पण तेव्हा जे उडाले कांही
तेज–जल–कण वर आकाशीं
विखुरलेल्या तारकांपरी, ते

अजून आहेत प्रकाशलेले
साठलें आहे थोडेंसें तेज त्यांच्यांत तेंच
तेंच आहेत हे भग्न अवशेष

भारतभूवर पसरलेले
जपा तयांना, चिंतन करा
त्यांच्या त्या अंधुक प्रकाशांतच—
कारण आहे थोडा अवकाश
अजून उष:काल होण्याला !

आणि आता ह्या रामगिरीवर
जात आहे अस्ता आजचा सूर्य !
सूर्यनारायणा !
विश्वाच्या सर्वदर्शी लोचना !
खासच आहेस पाहिला तुवां
आरंभापासून जगविकास
येथे ह्या सिंदुरगिरीभंवतीं
नांदलीं राज्यें वाकाटकांचीं
पाहिलीं आहेस पूर्ण वैभवांत
आहे ज्या कालाचें वास्तुशिल्प हें

तेजोभास्करा !
तुझ्या मावळत्या करस्पर्शाचा
वरदहस्त ठेविशील का
माझ्या शिरावरी ?
क्षणभर तरी —— एकच क्षण —

दिव्यदृष्टीने दाखविशील
वैभवाचा त्या परमोत्कर्ष ?
घेतले लोचन मिटून पाहा
विषण्ण मनें ध्यानमग्न मी
जुळवीत तींच कल्पनाचित्रें बसलों आहें !

उघडतां आता पुन्हा लोचन
झालेलें दिसे सारेंच सोनें
राम–लक्ष्मण–मंदिरांचीं त्या
शिखरें सारींच सोन्याचीं झालीं
––भोंसलेमहाल, बाराद्वारीच्या छत्रीचा घुमट–
सारा रामगिरी हेमाद्रि झाला
चमकती जणूं स्वर्णकणच
साऱ्या दिशांना !
संध्याकाळ ओती सुवर्णरंग
भिजून निघालें त्यांतच सारें
सोन्याचा मुलामा जणू बसला !

भग्नमंदिराचें आणि ह्या छत,
त्याच्यावर जें वाढलें आहे
पिवळें, वाळलें कोळ गवत,
तेंहि स्वर्णरंगीं चमकू लागे !
चमक जणू ही पूर्ववैभवाची
अस्ताला जातांना दाखवी रवि !
भग्नमूर्तीवर पाहा आता वाटे
केली किमयाच !
तिच्यावर तेज पसरुं लागे संध्यारागाचें

सूक्ष्म कौशल्य दिसूं लागलें,
विलसूं लागलें छिन्न मुखावर
मंद गूढ हासूं चिरशांतीचें
अभय देत चराचराला.!

देखा ! आहे ही वामनमूर्ति
पंचमावतार भगवंताचा !
अखंड कोरिली रक्तपाषाणीं
पूर्ण आकृति नऊ तालांची
रौद्ररसाच्या मुशींतच जणू ओतिली आहे
शिखेपासून नखांपर्यंत
लिहिलें जणू पाषाणांतच
ओजस्वी काव्य वीररसाचें !
ठाणमाण आहे कसें मांडिलें
उभें राहण्याची पाहा ती ऐट
नि:शंक धीट, अतिभंगांत
पीळदार समप्रमाण शरीर
वज्रदेही महायोद्धयाचें जसें
भरीव, सुंदर आणि रेखीव
उरुमाळ रुळे मांडीवरती
कटीस बांधिली–मुंज–मेखला
छाती रुंद ती सिंहासारखी,
विशाल स्कंध,
उगम जेथे अष्टभुजांचा विक्रमशाली,
जणू निघाल्या महावृक्षाच्या, बुंध्यामधुनी
विस्तीर्ण शाखा अष्टदिशांना !

वर उचलून उजवा पाय
स्थापिला आहे भार देऊन
बळीराण्याच्या मस्तकावरी,
दडपीत आहे त्याला पाताळांत.
दानशूर आणि महाबली तो
बलिराज पाहा वाकत आहे
प्रचंड भाराने शिरावरच्या
निर्विकार परि निश्चल मुद्रा
सत्त्वपालनाचा शांत आनंद
अढळ तीवर विलसताहे !
उत्तमांग आणि प्रभामंडळ
मुखच्छवि तैसी प्रभावशाली
पाहा वामनाची !
अद्‌भुत तीवर भावमिश्रण
शांत–विक्रांताचें.
आकृष्ट भिवया, विशाल भाल,
विस्फारित तेजें दिव्यलोचन,
स्फुरित नासिका, कंपित ओष्ठ,
ऐसें हें दर्शन त्रैलोक्यव्यापी
अद्‌भुतवामन महाविक्रम त्रिविक्रमाचें !
असाल थोडेसे मूर्तिकलाज्ञानी

कलेचें कौशल्य ओळखणारे
तर पाहून रेषासंगति
छिन्नविछिन्न ह्या मूर्तीमधली
उभे राहतील अश्रु लोचनीं !

पाहा, कशी ही एकेक रेषा,
वादी संवादी, स्थायी, आरोही
अवरोही स्वरविलास जणू,
आलाप घेत द्रुतलयींत
आळवीत आहे भैरवराग रुद्रतालांत ! !

देवाधिदेवा !
खंडित मूर्तीत आता कोठलें
अधिष्ठान आहे भगवंताचें
भाविकजना ?
पळाले पाहा पुजारी सारे
पोटार्थी बिचारे !
नवस सायास करणारे स्वार्थी भक्तजनहि--
आता मी नास्तिक बांधीत आहें
पूजा तुम्हां माझ्या मनोभावांची
उचंबळलेल्या हृद्भावनांची
कलेंत जो आहे अमर प्राण
आणि विकास मानवतेचा
त्यासच मानितों अधिष्ठान मी भगवंताचें
जनतारूपी जनार्दनाचें !
आणखी माझ्या ह्या भावपूजेंत
निसर्ग करीत मज संगत !
सायं--आरती देवा तुमची
रविराज हा करीत आहे
ओवाळीत आहे आपुल्या करें
संध्यातेजाचीं निरांजनेंच

डोलवीत आहे मंदानिल हा
छत्रचामरें तुमच्या शिरीं
नवविकसित तरुशाखांच्या किसलयांचीं
मोहर सुगंध वसंतांतला
उडी घेत आहे चरणतळीं
सळसळ चाले शुष्कपर्णांची
आरती म्हणत
अनाहतनाद चौघडा झडे हृदयांतरीं !

हाय ! माझ्या या मातृभूमींत
जिकडे जावें तिकडे दिसे
उच्छेदच सारा कलाकृतींचा
भग्नमूर्ति आणि भग्नमंदिरें
लहान मोठीं
जितुकी विपुल होती निर्मिती
तितुक्या असंख्य विध्वंसकृती
नामनिर्देशहि अशक्य त्यांचा !

केवढ्या विशाल कलाकृती ह्या,
निर्मात्री संस्कृति त्यांच्या मागली
जिचे होत्या त्या चैतन्य, प्राण,
पडल्या येथे ध्वस्त होऊन !

—संस्कृतिऱ्हासच मूळ कारण
सर्व नाशाचें !

—आणि कसा होतो संस्कृतिनाश
रहस्य जाणिलें पाहिजे हेंच

जगायचें आहे जगांत ज्यांना
स्वाभिमानाने स्वसंस्कृतीमध्ये
त्यांनी पाहिजे उलगडलें,
लावून घेऊन जीवा तळमळ
वाचिलें पाहिजे इतिहासाला !

इतिहास पाहा सांगत आहे
कसा झाला नाश राष्ट्राराष्ट्रांचा.
आधीं पोखरिली जाते संस्कृति
तिच्यांतील तेज नाहीसें होतें
लयाला जातें विचारसामर्थ्य
बनतात विद्या तात्त्विक केवळ
निरुपयोगी, चैतन्यहीन.
विसंगतच लोकजीवनाशीं
जीवनरसाशीं असमरस
खुंटतसे प्रगमनशीलता
दाबले जातात नवविचार
शक्तींचाच त्या विसर पडे
ज्यांतून अखंड विकास होतो
राष्ट्रजीवनाचा
हळूहळू मग नाहीसें होतें
सामर्थ्य देखील स्वरक्षणाचें,
उपेक्षिलें जातें सारेंच तंत्र
निजरक्षणाचें, संघशक्तीचें

मूठभर मग रानटी लोक
असंस्कृत पण नव्या जोमाचे

चेतलेले साध्या तत्त्वज्ञानाने
उठतात आणि जिंकतात त्या
जीर्ण राष्ट्राला,
मोडतात त्याची मृत-संस्कृति !

अरे ! ओळखा बुद्धिसामर्थ्य
आणि महत्त्व स्वरक्षणाचें.
घाला दोहोंचीहि योग्य सांगड
नका उपेक्षू ह्यांतल्या एका
तरच राहाल जगतांत ह्या
ना तरी मराल, व्हाल नामशेष !

विचारांत दिसे बुद्धिसामर्थ्य !
जाणा विचाराची प्रबळ शक्ति
विचारें आणिक तत्त्वज्ञानाने
अखिल मानवजाति हालते
कंप पावते, स्फुरण घेते
उद्युक्त होते, प्रोत्साहनाने महत्कार्याला
अशक्य वाटतें तेंहि दाविते
करून शक्य !
इतुकी प्रचंड प्रेरक शक्ति
विचारांत आणि तत्त्वज्ञानांत !

असंख्य दृष्टांत आहेत ह्याचे
आठवा त्यांतले एकदोनच
धर्मक्षेत्रांत कुरुक्षेत्राच्या
कुरुयुद्धाच्या आरंभवेळी

हतबुद्ध झाला अर्जुन वीर
दुबळ्या विचारें लोपलें त्याचें
अवसान आणि उत्साह, तेज
प्रज्ञाहतांचीं नेभळीं तत्त्वें
बोलूं लागला !
तेव्हा प्रेरिलें भगवंताने
तेजस्वी विचारें आणि तत्त्वज्ञानें
गीता—उपदेश कर्मयोगाचा
तयाला केला
उत्साहें उठला अर्जुन योद्धा
अरे ! तत्त्वज्ञान, धर्म, विचार
उदात्त कितीहि जरी असले
सूक्ष्म आणि दिव्य जरी वाटले
भासले, निघाले साक्षात् देवाच्या मुखांतूनच
तरीहि तयांना आचरूं नका,
समजूं नका, समजावूं नका
अशा मार्गाने, अशा योगें कीं
जेणें याच जगीं, याच जीवनीं
याच देहीं आणि याच डोळ्यांनी

उत्कर्ष सर्वांचा तुम्हां न दिसे !
समजा तें तत्त्वज्ञान भ्रामक
मिथ्या जें मानितें इहजगाला
तुच्छ लेखतें मानवदेहा
आणि जीवनाला !
मानवविरोधी जे जे विचार
मूर्तिमंत नाश जाणा खास ते !

निसर्ग आहे नीतिनिरपेक्ष
धर्माधर्माच्या, पापापुण्याच्या
अगदी पल्याड, पलीकडेच
कठोर दंडक आहेत त्याचे
सारखेच लागू चराचराला.
प्रकटतां त्याची विनाशशक्ति
धरणीकंपाच्या ध्वंसकरूपें
मंदिरें आणिक मदिरालयें
साधूची झोपडी, दुष्टांचे वाडे
मोडून टाकते एकाच वेळीं

चेतलेला त्या तत्त्वज्ञानानें
मिळविता झाला महाविजय !
आणि समर्थें रामदासाने
शिवरायाने छत्रपतीने
जागृत केलें महाराष्ट्राला
कसें ऐकितां समर्थ बोल
मराठ्यांना आलें शौर्य सामर्थ्य !
'अरे वह्नि तो चेतवावा रे
चेतवितांच चेततो' असें
निघतां वचन रामदासाचें
चेतलाच देखा स्वातंत्र्यवन्हि
महाराष्ट्रभर !
दीन दुबळा जरी मावळा
हरहर महादेव गर्जला !
बुद्धि भ्रष्ट होतां तसेंच पाहा
कसें फिकें पडे सामर्थ्यतेज

दुबळून जाते प्रचंड शक्ति !
कित्येक युद्धांच्या रणक्षेत्रांत
विजयश्री माळ घालीत होती
आपुल्या राजांच्या शूर सैन्याला
पण इतुक्यांत उठावी हूल
मेला, मावळला राज्यनायक
एकाकी व्हावें सैन्य बेदिल
पळावें फुटेल वाट तिकडे
धैर्यहत शत्रूलागीं मिळावा
फुकट जय !
विनाश आणखी राज्याचा व्हावा !
पराजय असे कितीक झाले
अशा चुकल्या तत्त्वज्ञानेंच !
जेथे नांदले हेच विचार
राज्य राजाचें, देश राजाचा
त्याचेंच सैन्य, त्याच्यासाठींच युद्धें लढाया
तेथें मरतां राजा नुरतें

प्रयोजन लढण्याचें सैन्याला !
मावळतो सारा उत्साह त्यांचा !
आणि पाहा ह्याच्या उलट स्थिति
जेव्हा जाणीव जिवंत होती
सारा महाराष्ट्र मराठ्यांचाच
सारेच मालक दौलतीचे त्या
तेव्हा नसतां ठावठिकाण
राजारामाचा,
लढला मराठा एका दिलाने

रक्षिलें स्वातंत्र्य महाराष्ट्राचें
——तत्त्वातत्त्वांचे खेळ हे सारे !
तसेंच पाहा हें दुसरें तत्त्व——
‘ क्षत्रियें केवळ युद्ध करावें ’
‘ ब्राह्मणें नुसते मंत्र जपावे ’
‘ वैश्याने करावा व्यापार आणि शूद्राने सेवा ’

सुखस्वास्थ्यांत संकटात वा
सर्वांनी हाच धर्म पाळावा !
येतां परचक्रें अशा स्थितींत
कोण होणार तेथे सांगता——
अरे ! देशाला लागतां आग
कोण ब्राह्मण, कोण क्षत्रिय,
वैश्य, शूद्र वा
सारेच सैनिक मायभूमीचे
करा रक्षण देऊन प्राण !
——नवल कशाचें विनाश झाला ! !

एका तडाक्यांत !
मानवनिर्मित विधिनिषेध
उच्चनीच भेद धर्माधर्म ती
जाणे न कांही !
उठतां वादळ महासागरीं
बुडतां नौका, पोहणारा वाचे महापापीहि
भवाब्धितारक पुण्यसंचय
तेथे न येई कांही कामाला !

जाणा निसर्गाचें सत्यस्वरूप
प्रकटलेलें त्रिगुणात्मक
उत्पत्ति, स्थिति आणि लयाच्या
त्रिविध रूपे
अफाट त्याची निर्माणशक्ति
उधळून देते अखंडपणें जगतावर
तरुलतांची, फळाफुलांची, जीवजन्तूंची,
प्रफुल्ल, समृद्ध, चैतन्यसृष्टि !
तसाच निसर्ग स्थितिरूपांत
शांत, शीतल, आल्हाददायी;
जगद्धात्री मायमाउली परी
पोशितो, रक्षितो आपुलीं बाळें
आपुल्या तंत्रें !
आणि धरूनी कृतान्तरूप
विक्राळ, क्रूर, प्रलयकारी
पंचमहाभूतें खवळून देतो
विकट तांडव नृत्य नाचून
स्वेच्छें करितो नाश सृष्टीचा !

—सदैव त्याचा हा खेळ चालला
कालचक्राच्या फेराफेरांत !!
आणि अशा ह्या निसर्गातच
जगणे आहे मानवप्राण्या
निसर्गानेच परिवेष्टित
जीवन त्याचें
जीवनविकास त्यांतच त्याचा.
निसर्गातल्या सर्व शक्तींचा

ाहिजे त्याने विचार केला
कारण मानवी जीवन आहे
निसर्गाचाच एक घटक
—विचारी अंश !

सर्व शक्ती ह्या निसर्गांतल्या
आहेत झालेल्या प्रतिबिंबित
मानवजीवनीं
स्फूर्ति घेऊन निसर्गातल्या निर्मितींतून
मनुज निर्मितो कलाकृतींची सुंदर सृष्टि
—प्रतिकृति नव्हे प्रतिसृष्टीच— !
निसर्गातल्या सौंदर्यश्रीचा
आस्वाद घेऊन मनमुराद,
विश्वासून त्याच्या स्थितिस्वरूपीं
बांधितो आपुलीं भव्य स्मारकें !
आणि बळावतां मूळ स्वभाव
पाशवी, ध्वंसक युद्धतृष्णेचा
हत्याकांड, नाश, जाळपोळहि,
करीत निघे,
मोडीत कृती मानवांच्याच
मनुजनाशास मनुज उठे !
निसर्गस्वभाव, निसर्गशक्ती,
निसर्गांत जें जें आहे तें सारें मानवांतहि
—आणखी अधिक त्याहून आहे—
निसर्गाची जी अंतिम सीमा
मनुजकार्याचा आरंभ तेथे
तेथून विकास मानवतेचा

तेथून पुढे जाण्यासाठीच धडपड त्याची
तेंच उद्दिष्ट साधायासाठी
त्याची कला, शास्त्रें, विद्या, तत्त्वज्ञान
धर्म, आचार, विचार आणि नीतिनियम.

देखा ! भगवंत वामनमूर्ति
सांगत रहस्य अवताराचें–
असलांत जरी आज वामन
वाढ खुंटलेले, खुजटलेले,
दबले, दाबले चाऱ्ही बाजूंनी
तरीहि धरा त्रिविक्रम रूप
दावा पायांखालीं बळीकाळाला––
सांगण्यास जणूं हाच संदेश
खंडित तरी लढत नित्य
निसर्ग–काळाच्या नाशशक्तींशीं
अजून येथे समोरच उभी
भग्नमंदिराच्या भग्नमूर्ति ही ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २१७६८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# धुंवारी

उदासीन मन
झालें कां ये वेळीं
आणिकांचे मेळीं
सुख न ये

उसळले ढग
आभाळ भरून
आलें अंधारून
जग सारें

कोसळे पाऊस
सरीवर सरी
दाटली धुंवारी
चोहींकडे

तुझा ये आठव
अशा अवसरीं
मूर्ति चित्तांतरीं
उभी राहे

जगांत राहून
जनास पारखा
आठवी सारखा
प्रेम तुझें

# शर्वरिणी

उघड उघड उघड दार
प्रियकरास आपल्या
उघड दार. . .

मध्यरात्रिच्या नभांत
शांत चांदणें खुलें
पांघरून रश्मिजाल
गाढ झोपलीं फुलें

गाढ झोपलीं फुलें
अजुन हा निजे न भृंग
मरंद गुंगिनें भुलून
मंजु गुंजनांत दंग

अधिर त्या नको सकाळ
त्या दिशाहि उजळल्या
मध्यरात्रिच्या निळयांत
उघड उघड पाकळ्या

उघड उघड उघड दार
प्रियकरास आपल्या
उघड दार. . .

## झळ

केळीचे सुकले बाग
　　असुनियां पाणी
कोमेजलि कवळीं पानं
　　असुनि निगराणी
　　　　केळीचे सुकले बाग

अशि कुठें लागली आग
　　जळति जसे वारे
कुठे तरी पेटला वणवा
　　भडके बन सारे
　　　　केळीचे सुकले बाग

किती दूरचि लागे झळ
　　आंतल्या जीवा
गाभ्यांतिल जीवन रस
　　सुकत ओलावा
　　　　केळीचे सुकले बाग

किती जरी घातलें पाणी
　　सावली केली
केळीचे सुकले प्राण
　　बघुनि भवतालीं
　　　　केळीचे सुकले बाग

## पहाट

आता काय बोलूं
बोलणें न उरे
अबोल्यांत सरे
    सारें कांहीं
    सारें कांहीं

बोलणें बोलून
सांगणें सांगून
मागणें मागून
    मागें राही
    मागें राही

वरी गेली रात
जरी अंधारांत
हृदीं आठवांत
    ठाव होता
    ठाव होता

परी पुढें आतां
पहाट फुटतां
नेत्र उघडतां
    उजाडलें
    उजाडले

अंधाराचे सरीं
मरावले डोळे

प्रकाशीं आंधळे
झाले आतां
झाले आतां

सोपें होतें वाट
तमांत चालणें
कोठें तरी जाणें
न जाणतां
न जाणतां

परी तेजाळतां
मार्ग हे अनेक
मज माझा एक
सापडेना
सापडेना

दिपले हे नेत्र
प्रकाशाची सृष्टी
पाहण्यास दृष्टी
मागतात
मागतात

# प्रीतीची रीत

अशिच ही प्रीतिची रीत
डोळ्यांत आंसू नि
ओठावरीं हासु
मनींचें मनींच गुपीत
अशिच ही प्रीतीची रीत

हृदयांमधें आग
परि गालिं फुलबाग
उसाशांतहि फुलवीत
अशिच ही प्रीतीची रीत

विरहांत बोलणें
भेटींत राहणें
नुसतेंच मुख न्याहाळीत
अशिच ही प्रीतीची रीत

मौनांतला अर्थ
शब्दांमधें व्यर्थ
लपवूनही सूचवीत
अशिच ही प्रीतीची रीत

फसूनी जगा फसवीत
अशिच ही प्रीतिची रीत
जरि अंतरीं ध्यास
बाहेर परिहास

# निर्वासित चिनी मुलास

हें जीर्ण जग !
जगत आहे जें जगू न देतां एकामेकांना
असतां विपुल सर्वांना जागा
पृथ्वीच्या पाठीं नांदाया सुखें
जमिनीसाठी दुसऱ्यांच्या जें
हपापून आहे लढत नित्य
कमीनपणें
मरत आणीक करीत सर्वांना
जमीनदोस्त !

संपन्न समृद्ध असतां सृष्टि
जीवनोपयोगी धनधान्याने
माजविली आहे कृत्रिम ज्यांत
उपासमार
पिकवायाची फिकीर न ज्या
विकायाची मात्र अशा चोरांनी
गळेकापूंच्या चढाओढींत . . .
मानीव मोलाच्या सुवर्णालागी
मानवी प्राणांपेक्षाहि मोल
विकत घेतात मौक्तिक जेथे
कीटकजन्य
श्रमजन्य घर्मबिंदूंचे मोती
मातीमोलाने

आणि दगडांच्या पोटचीं रत्नें
यत्नावीण घेती सवंग अशा
कष्टोपजीवींच्या उत्पादनाला
अर्थशास्त्राचा अनर्थ असा
चालला ज्यांत
प्रमत्तांच्या हातीं ज्यांतील सत्ता
अक्कल गहाण भांडवलांत
त्या जीर्ण जगा
अवास्तवाला कवटाळल्याची
झिडकारल्याची आणि वास्तवाला
ही घोर शिक्षा
भेसूर युद्धाची
जेत्यांना आणि पराजितांना
उभयतांनाहि मरावयाची !

होवो तरी आता एकदाचा त्या
जीर्ण जगाचा
आणि अमानुष मरणोन्मुख
संस्कृतीचा त्याच्या सर्वेच त्याच्या
नि:शेष अंत !
खंत नच त्याची आता आम्हांला
गाळायास नाही एकहि अश्रु
आहोंत आम्ही करीत गोळा
लाकडें त्याच्या सरणासाठी
अधीर झालेले आहोंत किती
पेटवायाला तयाची चिता . .

चिंता हीच की
ठरो हें युद्ध शेवटचें त्याचें
अखेरचीच त्याची धडपड
चुकूनहि नच ह्यांतून वाचो ! !

त्या जीर्ण जगाच्या चितेंतूनच
उडणार आहे अमर पक्षी
नव्या स्थितीच्या नव व्यवस्थेच्या
नव आदेशाचा नवाकांक्षांचा
घेत जगदंड स्वपक्षांखाली . . .
नाही तो कोमल कपोतदूत
युद्धान्ताच्या आणि उद्भवणाऱ्या
त्यांतूनच नव्या युद्धारंभाच्या
मध्यकाळांतील दुबळी शांति
घुमविणारा . . .
युद्धाचें निमित्त मतंगज जे
त्यांना उचलून स्वपंज्यांमध्ये
दूर अंतराळीं भिरकाविणारा
आहे तो प्रबळ शांति-भिरुंड
नव्या जगाचा !

नवें जग जें
जागणार आहे जन्मून आता
स्वातंत्र्य-समता-बंधुत्वाच्या तें
बोलणार नाही बोबड्या गोष्टी
वास्तवतेचा सर्वस्वतेचा

आणि निकराचा बंधुभाव जो
कणाकणांतून नव्या रक्ताच्या
मानवतेच्या नाचवील तें
उसळेल तो चेतना देत
नव्या शक्तींना
निर्मितील ज्या सम अर्थाचें
नवें सामर्थ्य
उपभोगील जें सारखेपणें वाटून घेत
सर्वांची सृष्टि
कृपाप्रसादाचीं फळें आणि तिच्या
सेवेचे कष्ट !

नवें जग तें . . . !
ज्यांत न होतील मानव धनी
अथवा दास मानवांचेच
परकष्टांवर पुष्ट व्हायला
ज्यांत ना जागा
मात्र भरपूर सहश्रमाच्या
सहजीवनांत नांदावयाला
विक्रम जेथे न म्हणेल कोणी
पराक्रमाला आक्रमकांच्या
मिळेल ना त्याला कोठेहि थारा
आणि मानवाला बांधावयाला
चीनच्या भिंती
उरेल न भीति मानवांचीच
संहाराचे शोध लावे जी बुद्धि

करील ती उभा सर्वांच्यासाठी
मानवहिताचा समाहाराचा
नवा संसार ! !
तें जग नवें
बाळा, तुझ्या ह्या आर्त हाकेने
व्याकूळ होऊन येणार आहे
सांभाळ कराया सदाचा तुझा
त्यांतच आहे उजाडणार
दिवस तुला
आशेच्या उज्ज्वल भवितव्याचा
धीर धर थोडा !
येणारच आहे तुला तें पोटीं
तूंच त्यांची शक्ति
आणि उमाळा . .
तुझ्याचसाठी
बाळा, ह्या नवीन जगाच्या गोष्टी
हीं तुम्ही बाळें
तुम्हीच आहां नांदणार त्यांत
आणि तयाला नवीनपणांत नांदविणार !
—येणारच आहे—येतच आहे—
—आलेंच पाहा !
तें नवें जग . . .
नवें जग तें नव आशांनी हासविणारें
क्षणभरहि साहणार नाही
पाहणार नाही तुझे हे डोळे
असे भ्यालेले

पूस आता आसूं आणि हास बरें !
--नको--नको--पण--थांब--थोडासा
पाहूं दे पुन्हा ह्या जीर्ण जगाला
आपल्या आसुरी कर्मांची फळें
कावरेबावरे भेदरलेले
ते तुझे डोळे ! !

# भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन

मध्यें गेलेल्या सात वर्षांत
सफेदीचीं पुटें चुन्याचीं सात
चढलीं आहेत मंदिरावरी
रामलक्ष्मणाच्या
सफाईनें आणि फिरला आहे
उपद्रवी हात कोणाचा तरी
केवढा काढला आहे चिपोरा
उरलेल्या त्या एका पायाचा
भग्नमूर्तीच्या !

तेंच औदासीन्य !
भकास जीवन तेंच कळानष्ट
तशींच मेलेलीं मलिन मनें
मध्यें गेलेल्या सात वर्षांत
चढलीं आहेत त्यांवरतीहि
आणखी पुटें तशींच सात
अज्ञानाचीं आणि अंधकाराचीं
निराशेचीं आणि गांजणुकीचीं
दुबळेपणाच्या दरिद्रतेचीं
सूकरसमान समाधानाचीं
हीन स्वार्थाचीं, दांभिकतेचीं
किंकर्तव्यमूढ
पराजयगामी मनोवृत्तीचीं !

अरेरे ! ह्याच सात वर्षात
उलाढाली झाल्या जगांत किती
नवशक्ति किती उफाळून आल्या
कितीतरी गेली जळून खाक
मेलेलीं मढीं
पुढील घडण घातली गेली ! !
आम्ही मात्र देत आहोंत तींच
सफेदीचीं आणि अंधकाराचीं
वार्षिक पुटें !

सुटणार आहे झंजावात तो
एकदाचा कधी
हालवील जो हें स्तब्ध जीवन
उसळवीत प्रचंड लाटा ?
झालें नाहीं जे मध्यें गेलेल्या
सात वर्षांत
होणार आहे का पुढें येणाऱ्या ?

## उद्या-- !

उद्या ! उद्या तुझ्यामधेंच
   फाकणार ना उषा ?
तुझ्यामधेंच संपणार
   ना कधीं तरी निशा ?

उद्या, तुझी धरून कास
   आज कार्य आखलें
तुझ्यावरी विसंबुनी
   कितीक काम टाकलें !

उद्या, तुझ्याचसाठिं आज
   आजचें न पाहतों
तुझ्याकडेच लावुनी
   सदैव दृष्टि राहतों

उद्या, तुझ्यामधें निवान्त
   आजचा अशान्त मी
उद्या ! तुझ्यामुळें जिवंत
   आजचा निराश मी !

# प्रीति तुझी माझी

प्रीति तुझी माझी ही
   प्रीति तुझी माझी न
अवतालीं भंवतालीं
   जागतें जीवन !

प्रीति तुझी माझी
   प्रीति रम्य फुलबाग
खुलवीत खुलतात
   किती महाभाग
प्रीति तुझी माझी
   जरी रम्य फुलबाग
जगतीं जीवन आणि
   जगतांत जाग !

प्रीति तुझी माझी
   प्रीति निराळीच दुनिया
निराळे म्हणोत कोणी
   निराळे बनुनिया
प्रीति तुझी माझी
   नाहीं निराळेपणाची
जगांतल्या सुखदु:खीं
   मिळालेपणाची ! !

# फुलचिमणी

सकाळपासून शीळ घालिसी चिमणी तूं नवलाची ग ऽ
भान हरपवी क्षणिं चित्ताचें गीत तुझ्या हृदयींचें ग ऽ

दो पंखांचा जीवपसारा इवलासा लोभसवाणा
चिमणी चंचू हळुच सोडिते शीळ घेत मंजुळ ताना
भिरभिर भिरक्या गिरक्या मारित सूर घेत वरतीं खालीं
तरळत फिरसी फुलाफुलांच्या लतातरूंच्या भवतालीं
ह्या पुष्पाहुन त्या पुष्पावर पुष्पपरागा अनुराग
सांगत गुंगत डोलत बोलत डुलवित पुलकित फुलबाग

थांब जरा उकलुं दे साद ही नाद परिचयाचा वाटे
नकळत जागत सुप्त स्मृती मम हुरहुर हृदयामधिं दाटे
हेच सूर, ही तान, गान हें ह्या हृदयांतहि सळसळलें
हीच वृत्ति बेभान, नाहीं पण शब्द तयांतिल आकळले
चित्त तसें उन्मत्त गुंगलें अथांग ती बोलत भाषा
अशीच घालित शीळ राहिलें शब्दांची सोडित आशा

सकाळपासुन शीळ घालीसी चिमणी तूं नवलाची ग ऽ
भान हरपवी तसेंच आजहि गीत तुझ्या हृदयींचें ग ऽ

# श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशीं

थरारून येई रोमांच शरीरीं
झळक इथें ही अशी कांहीं न्यारी
प्रकाशा दिपवी असा हा प्रकाश
समाधिस्थ येथें बैसले ज्ञानेश !

जीवनाचा अंत होऊनियां खालीं
पडे देह तैसा इथें नाहीं खालीं
इथें रोमरोमीं जीव मूर्तिमंत
धरूनी विसांवे चैतन्य अनंत

प्रसादास येथें मिळत प्रसाद
पडसाद ऐके मुळांतली साद
प्रतीतीस होत प्रतीत प्रतीती
आणि स्फूर्तिलागीं येत असे स्फूर्ती

एका जनार्दनीं मिळालें भांडार
ऐकुनियां आला कुणी हा पामर
नसे संत कोणी भाविक ना भक्त
असे जीव मात्र जीवनीं आसक्त

तळमळ काही धरूनियां पोटीं
मिटलेल्या ओठीं रिकाम्याच ताटीं

तयावरतीहि कांहीं कृपा करा
उघडा थोडीसी ताटी ज्ञानेश्वरा !
तुमच्या स्मरणें उचंबळे मन
तुमच्या वाणीचें करीत चिंतन
तुमच्या चरणीं मस्तक ठेविलें
उचलावयाचें भान न राहिलें ! !

# मानवता

अन्याय घडो कोठेंही
चिडून उठूं आम्ही
घाव पडो कोठेंही
तडफडूं आम्ही
हाल पाहून हळहळूं
होवोत कोठेंही
पिळणूक पाडील पीळ आम्हां
असो कोणाचीही
वजन आमच्या छातीवर
पायांतल्या बेड्यांचे दासांच्या
वळ पाठीवर आमच्या
चाबूक उडो कोठेंही
अवघ्या अभाग्यांचे अश्रू
उभे आमच्या डोळ्यांत
दु:खितांच्या वेदनांच्या
कळा उरांत आमच्याही
(संवेदना साऱ्या जगाची
हृदयांत आहे भरभरून
नातें नवीन असें कांहीं
जोडून आहोंत आम्ही
मानव तेही मानव आम्ही) सं. २५.

# धडकी

दूर नाहीं पावसाळा आतां
उत्कंठित मन झालें माझें
कसलीसी हुरहुरहि
लागून राहे
नाहीं 'अन्यथावृत्ति' ती
मेघालोकाची

सुचवीत 'सावनके दिन आये'
धडधडत नाहीं हृदय माझें आज
साज कल्पून वर्षेच्या अभिसाराचा
चुकणार तर नाहीं ना येण्यास
ही चंचल वर्षा ?
शंका येऊन
धडकी भरे !

आलीच नाहीं जर वर्षा ती
उधळीत हर्षाला
असेंच राहिलें हें निळें आकाश
खेळवीत सावकाश
जर पांढऱ्या ढगांना
तसाच राहिला वाहत जोराचा
गार गार वारा

पळवीत पार पार
आल्या आभाळास
रोहिणीवर आरोहण नच झालें
जलदांचें
मृग झाला वंचित जर
मृगजळानें
आर्द्रा करीत गेली
सांद्र मात्र नयनांस
पुनवसु न वरसून
पुष्य हुश्श करून सुस्कारला
आश्लेषा कंठाश्लेषांचीं
निसटली देत आश्वासनेंच
मघा पुढें वघा म्हणाली
आणि पूर्वा दुर्वांहि
झाली वाळविती
उत्तरा निरुत्तर बसून
हस्त भलतीकडेच
मस्त होऊन उधळला
चित्रेनें धरिलें वर
भयानक विचित्र रूप
स्वातीनें वाती दिल्या हातीं
सत्ताविसांतून जाऊन नऊ
शून्यच राहिलें बाकी
तर—?
चिंता जडून
धडकी भरे !

हे व्ययनाम संवत्सर शकाचें
हेमलंबी – विलंबी नाम
संवत्सर संवतांचें
सार्थनाम झालें अन्
ठरलें जर फसलें वर्षच
फसलीचें
फलज्योतिष्यें निष्फळ झालीं
राजा बुध, मंत्री शनी
अग्रधान्येश मंगळ
मेघेश शुक्र, रसेश गुरू
पश्चाद्धान्येश रवि
गडगडलें जर
संवत्सराधिपांचें
मंत्रिमंडळ हें
दुहीनें आपसांतल्या
किंवा सम्राट निसर्गानें
निर्णय लाविले फेटाळून त्यांचे
मेघानें द्रोण नांवाच्या
निवास करून वणिग्गृहांत
होऊन पंचमस्तंभी
नरेंद्र नाम नागास जर
करूं दिला विघ्नसंतोष
तर— ?
हतबुद्ध होऊन
वावरून
धडकी भरे !

"काले वर्षंतु पर्जन्य:
पृथिवी सस्य शालिनी
लोकोयं क्षोभरहित:
शांति: शांति: शांति:
शांतिरस्तु पुष्टिरस्तु
तुष्टिरस्तु. . . ."
प्रार्थना जर झाली ही
व्यर्थ निरर्थ आमची
तर—?
केविलवाणी कींव कळून
कळवळून
धडकी भरे !

तर—?
तर काय
घोर अवर्षण
दुष्काळ विक्राळ !
कणन् कण धान्याचा
मिळवून, मोजून, खाऊन
राहून अर्ध–नाहीं–चत्कोर पोटीं
आशा धरून एकेक क्षण
कंठणारे जीवन वाट प
अग्रधान्याची
पुढल्या पिकाची
मरणार बिचारे भुकेनें
तडफडून

लाखो लोक
आमचे
पाहणार आम्ही मरणारे ते
पाहवतहि नाही म्हणत
कण्हत, तणतणत
हळहळत
पण जेवत दोन्ही वेळ
बेशरमपणें जिवंत राहत
घृणा येऊन माझी मलाच
भीती वाटून
धडकी भरे!

करणार काय आम्ही
करून करून ?
भीक मागून परदेशी
धान्य आणून
इकडचें पाठवून तिकडे
काढून दडवलेलें
मतलब्यांना दंडून
असे तसे वाटून देत
प्राण वाचवूं कांहीं !
राहूं पण तसेच अवलंबून
देवावर, दैवावर
लहरीवर निसर्गाच्या
जुन्या जीवघेऊ,
राज्य नीतीवर

उधळपट्टी करीत
अफाट मानवशक्तींची
स्वार्थात, भांडणांत
लढण्यांत, मारण्यांत, मोडण्यांत
छिनून घेण्यांत
धन धान्यांना
साठविण्यांत, सडविण्यांत
जाळण्यांत
पुन्हा आणीत दुष्काळ असा !
चीड येऊनी
भणभणून
धडकी भरे !

ही हलाखी
हाल अपेष्टा ह्या
हे निष्फळ कष्ट
हीं दुःखे, हे रोग, सांथी
ह्या लढाया
दुष्काळ हे, हीं मरणें
ही बरबादी
घालविणें आहे आमच्याच हातीं
मानवांत ती शक्ति
देवाचा, दैवाचा, निसर्गाचा
उपसर्ग ना पोंचे जिथें
अशी
जगव्यवस्था

मानवा निर्मावया बुद्धि असे
सामर्थ्य त्याचें जाणवून
नेणीव पाहून तळमळून
तडफडून
धडकी भरे !

श्वास उद्या उठतील
हे भुके कंगाल
आणि लोक सारे
जगनिष्ठावंत
विचारवंत, नवे कलावंत
सोडून भ्रांति
करीत क्रांति
भविष्य दिसून
रोमांच स्फुरून
येत थरथरून
धडकी भरे !

# बंड

आहे हृदयांत आता
नुसतें उद्दाम बंड भरलेलें
करीत थंड उरलेले भाव
भावना मुरलेल्या

विटलों आह्मीं पुरतेपणीं
त्याच त्या
शृंगारवीरकरुणादि
नवरसास
रसरसून उसळवील जो
मानवतेच्या प्रक्षोभास
असा रस अखंड
स्थायीभाव विभाव अनुभाव
संचारी भाव त्याचे
अनुभवीत आह्मीं पाखंडी

शरीरांतल्या रक्ताच्या
अणूअणूंचा
अणुस्फोटक करणाऱ्या
रसायनशास्त्राच्या साहित्याचा

आहो घेऊन ध्यास
हटविण्यास हल्ले
शत्रूचे मानवमात्राच्या
किल्ले उडविण्यास
क्षणार्धांत अस्मानांत
धुळींत मिळविण्यास तडाक्यांत
साम्राज्यें अंधारयुगांचीं
स्थापायास अधिराज्य
समतेचें

# पेर्तेव्हा

व्याकुळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळतां
जळतांना जागोजाग वणव्यांत
नव्हती एकहि हुंदका देत
दिसूं देत अश्रू नयनांमध्यें
दाबीत होती आंतल्या आंत
दु:खांचे कढ
करुनी आपल्या जिवाचें पाणी
पुरवीत होती खोल मुळांना
फुटत होती तरुलतावर
नवी पालवी
फुलोर, बहर, फुलाफळांचा
गाऊं लागले बुल्बुल आणि
कोकिळहि घेऊं लागले ताना
उन्मत्त प्रीतीच्या, विरहार्ततेच्या
नवोन्मेषाच्या
वसंत...वसंत.. !
......तूं मात्र शांत !!

तूं मात्र शांत...
दाटलेल्या कंठीं
आटले होते जणू तुझे शब्द
वाढत होती तळमळ पण

हृदयामधें
नव्हतें संगीत सळसळत--
व्याकूळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळत !
. . . .तूं मात्र शांत ! !

वसंत सरे, मोहर गळे
विलगून फळे फांद्याफांद्यांना
वाढत होतीं, पक्व होत होतीं
कितीक गळून पडत होतीं
वाहतां थोडेसे वादळी वारे
कोकिळाच्या गोड गीतांत आतां
भरलेली होती किती आर्तता--- !
वाट पाहात वेळ येण्याची
हृदयांत पण हळहळत
तूं मात्र शांत. . . . !

. . . .तू मात्र शांत
पृथ्वीचाहि होता ताप वाढत
आसावलेल्या जीवांना भास
मृगजळाचेहि भुलवीत होते
वाऱ्याचा वाढत होता पण जोर
फडफड होत तुझ्या पंखांची
दूरचीं क्षितिजें न्याहाळून तेव्हां
पाहून आलास वादळाच्या खुणा

आतुरपणें
तरीहि नव्हता फुटत शब्द
तूं मात्र शांत....!

घोंघावत होता रात्रभर वारा
दिवसा धुळीचे लोट, वावटळी
उठवीत होता
कडाडत होते जीर्ण वृक्ष आणि
मोडून पडत होत्या कितीतरी
कोवळ्या फांद्या
आणि संध्याकाळ होण्यापूर्वीच
क्षितिजाच्या कडा आक्रमीत होते

काळे निळे मेघ
आणीत होता ओढून त्यांना
सोसाट्याचा वारा....
तुफान...वादळ...
आदळत ढग ढगावरती
व्यापीत आकाश
पृथ्वीच्या जवळ जवळ आले
अंधार भरे....
क्षणभर होई सारें निस्तब्ध !
आणि ओठावर आले तुझे शब्द !!

चकाकली वीज
गंभीर घुमली घनगर्जना
निनादले तिचे साद पडसाद

सुरू झाली वृष्टी
मृगाचा पाऊस बरसूं लागे
थरारे सृष्टी !

कडाडूं लागल्या विजावर विजा
सरीवर सरी वर्षत गर्जत
वादळात आणि कल्लोळांत त्या
आसरा निवारा सोडून देत
उडालास तूं भराऱ्या घेत
बेफामपणें
मेघामध्यें वर
परत खालती माळरानावर
पुन्हा वर खालीं नव्या भूमीवर
नांगरलेल्या
आणि विजांच्या लखलखाटांत
मेघांच्या गंभीर गडगडाटांत
फुटे तुला शब्द--

" भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठा रे उठा रे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा पेरा पेरा
नव बीजें पेरा
नव्या आशा धरा
पेर् ते व्हा ! पेर् ते व्हा ! ! "

वादळ ओसरे तरीहि स्फुरे
तेंच आर्त गीत !
माळरानावर
नांगरलेल्या नव्या भूमीवर
घिरट्या घालीत भराऱ्या घेत
ओतीत जासी तू कळकळीच्या
भावपूर्ण स्वरे
तेंच शब्द आणि त्याच लकेरी
त्याच गीताच्या
पे्र् ते व्हा ! पेर्तेव्हा ! !

# वाट

मला आवडते वाट वळणाची
दाट झाडीची नागमोडीची
ही अलिकडची नदिच्या थडिची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
सरघसरणीची पायफसणीची
लवणावरची पानबसणीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
अशि भुलवणिची हुलकावणिची
सागवेळूच्या भर रानींची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
जरा अडचणिची चतउतरणिची
घाटमाथ्याची ती पलिकडची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
इथची तिथची कधि कुणिकडची
क्षितिजाकडची पुढची पुढची
मला आवडते वाट वळणाची

# एकोणीसशे सत्तेचाळीस

वर्तमानपत्रें
वाचवतहि नाहीत आता
खिन्नपणाने तीं हातांत घेतों
टाकून देतों तशींच
पाहून वरचे जाड मथळे,
काळे काळे खिळे
घण पोलादी
ठोकीत जातात माझ्या मस्तकात !

जिकडेतिकडे भेसूर वार्ता
पाशवी वृत्तींचें नग्न दर्शन
युद्धालाहि घृणा आणतील अशीं
क्रूर कृष्णकृत्यें !
नीचपणाची नीचतर सीमा
अत्याचाराची, बलात्काराची
निष्कारण वध, राक्षसी कत्तली
जाळपोळ, लूट घरादाराची

आणि हें सारें
शांतीच्या धर्माचा करीत वरती
जयजयकार
देत आरोळ्या 'देवच महान्' !

आणि त्या अत्याचाराचे बळी
शिदोडहि वर उसळून यावा
इतकी साहत मानखंडना
शिसारी येईल असें जीवन
मरतां मरतां कवटाळीत
लाचारीला लाज आणील अशी
त्यांची लाचारी !

गूढ गूढ गोड, उच्च उच्च रम्य
ललित ललित विरल तरल
उदास कोमल
नव वंगालच्या नवसंस्कृतीचा
पूकराखाली
जमलेला हा वंगाळ गाळ
नौखालींतला
उपसला आणि फासला जात असतां तोंडा
तिकडे उडत पंजाबच्याहि
धिप्पड उंच रुंद देहावर
जालीम तेजाब,
मिशाळ केसाळ भव्य चेहऱ्याचा
उतरवीत रुआब खाली
तिथेहि तेंच ! !

आदळत आली आता त्यावरी
घोर घोषणा
कानांत ओतीत तापलें तेल

अखंड आमच्या मायभूमीचीं
करून खांडकीं तीन तीहीकडे
स्वातंत्र्य म्हणे मिळणार आम्हां !
घेतलें आहे का गुंगीचें औषध
आम्हीं सर्वांनीं की आम्हीच तिचे
प्राण असतां
आम्हीच तिचा देह असतां
वेदनांनी आम्हीं व्याकुळ न व्हावें ?
तिच्या शरीराचे तुकडे होतां !

अरे ! आमच्या कालच्या भावा,
असून आमच्या हाडामांसाचाच
वेष बदलून, केस वाढवून
दाढीमिश्यांचे,
कैफ चढवून कुठला तरी
बहकून दुष्ट भडकावणीने
झाला आमचा इतका वैरी
की वाटणीचा मांडून दावा
आईचे मागसी तुकडे करून !

आमचाच तूं
कधी ना तरी येशील आपल्या ठिकाणावरी
धरूनी अशी बावळी आशा
आम्ही तुझे हट्ट पुरवीत गेलो
लाडवीत तुला
सहन करीत तुझे वेडेचार

[illegible] एकोणीसशे सत्तेचाळीस

किती तुझ्यासाठी खस्ता खाऊन
स्वार्थत्याग केले
त्याचें असें हें देतोस फळ
सत्तालोलुपांच्या कारवायांना
पडून बळी ?
वाटतें तुला की आम्ही कधीहि
उतरवूं नच शकूं त्यांची धुंदी ?
विशाल मानवी नवसंस्कृतींत
तुला समावून घेऊं न शकूं ?
परत ओढून तुला आणाया
होणाऱ्या क्रांतींत बळच नसे ?

अघोर घटना घोर वर्षाच्या ह्या !
स्वराज्य मिळालें म्हणतां काय !
जिंकलें म्हणतां स्वातंत्र्ययुद्ध ?
सुवर्ण-अक्षरीं लिहून ठेवावें
काय हे वर्ष ?
नाही, नाही, तें तापल्या सळया घेऊन हातीं
जळत्या अक्षरीं छातीवरती
वाटे डागावें !
५७ चें एक अपेश
दुसरें वर हें ४७ चें
तयारींत राहा
स्वातंत्र्याचें युद्ध
पुढेच आहे ! !

# आज अंधारी रात

आज अंधारी रात आहे
चदेरी दरिया नसे
ताराची बरसात आहे
विश्व सारें स्तब्ध आहे
कसल्या तरी धुंदींतला
ओठांवरी शब्दार्ध आहे
दूरच्याहि दीप नाही
(मारीकडे काळोख आहे
अंतरंगीं त्यांतहि पण
ओळखीचा प्रकाश आहे
आज अंधारी रात आहे

## रुसवा

अजुनी रुसून आहे खुलतां कळी खुले ना
मिटले तसेच ओठ की पाकळी हले ना !
समजूत मीं करावी म्हणुनीच तूं रुसावें
मीं हास सांगतांच रडतांहि तूं हसावें
तें आज कां नसावें, समजावणी पटेना
धरिला असा अबोला की बोल बोलवे ना !
कां भावली मिठाची अश्रूंत होत आहे
विरणार सागरीं ह्या जाणून दूर राहे ?
चाले अटीतटीने सुटतां अढी सुटेना
मिटवील अंतराला ऐसी मिठी जुटे ना !
की गूढ कांहि डाव, वरचा न हा तरंग
घेण्यास खोल ठाव, बघण्यास अंतरंग ?
रुसवा असा कसा हा ज्या आपलें कळेना
अजुनी रुसून आहे खुलतां कळी खुलेना !

# गाठ

आज अचानक गाठ पडे
भलत्या वेळीं भलत्या मेळीं
असतां मन भलतीचकडे
आज अचानक गाठ पडे
नयन वळवितां सहज कुठे तरी
एकाएकी तूंच पुढे
आज अचानक गाठ पडे
दचकुनि जागत जीव निजेंतच
क्षणभर अंतरपट उघडे
आज अचानक गाठ पडे
नसतां मनिमानसीं अशी ही
अवचित दृष्टिस दृष्टि भिडे
आज अचानक गाठ पडे
गूढ खूण तव कळुन नाकळुन
भांबावुन मागे मुरडे
आज अचानक गाठ पडे
निसटुनि जाई संधीचा क्षण
सदा असा संकोच नडे
आज अचानक गाठ पडे !

# पर्यंत

सोबत आहे तुमच्या मीही
कांहि दूरपर्यंत
गडे हो कांहि दूरपर्यंत
परंतु पुढती नाही म्हणुनी
नसो खेद वा खंत !

आहे सोबत तोवर आहे
तुमचें सर्व पसंत
गडे हो तुमचें सर्व पसंत
तुमचीं माझीं कामें करितां
नच घेईन उसंत !

निश्चित पुढची वाट असे ही
निश्चित आणिक अंत
गडे हो निश्चित आणिक अंत
मधेच पण मी निघून जाइन
शोधायास दिगंत !

कुणी नका येऊं मजमागे
तिकडे नच पदपंथ
गडे हो तिकडे नच पदपंथ
केवळ आहे अंतर तिकडे
नुसतें भ्रांत अनंत !
कुठे जायचें तेंहि कळेना
दूरदूरपर्यंत !

# तहान

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों अनंत ताऱ्यांनी थरारलेली तरल हवा
सुखदु:खांचे ऊन थंड श्वास
आशानिराशांच्या अंतरंगांतील अदम्य विश्वास
मिसळून आर्द्र झालेली हवा

जिवालां लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों आकाश-धरेच्या भास्वररंगांचा स्निग्ध ओलावा
अवसेच्या काळचा डोळ्यांतील पाणी
पुनवेच्या अंगीं रजतरंगाचे हिमसेक, आणि
विनाकिनाऱ्याच्या सागरावरचे निळे तुषार
गवतावरल्या लसलसत्या हिरव्यागार
रंगामधल्या दवबिंदूंचा स्निग्ध ओलावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो जिवलगांच्या सहवासांतील तृप्त विसावा
स्तन्य ओसंडितां बाळाच्या ओठीं
जड पापण्यांत झाकळतां दिठी
प्रियाप्रियकरमीलनाची सैल पडतां मिठी
आकंठपूर्तीचा दिसे जो विश्रब्ध तृप्त विसावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों वासांत भिजल्या आठवणींचा ओला गारवा

मातीच्या उन्मत्त गंधांत न्हालेली प्रथम भेट
सागाच्या फुलांत चिंब झालेली खिन्न ताटातूट
प्राजक्तांच्या हारीं झिमझिम सरी पुनर्मीलन
मोगऱ्याचा वास चिरसहवास
दुरावतां आणि दूरदुरून
पिकल्या धानाच्या सूक्ष्म सुवासाच्या आठवणींचा ओला गारवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों स्मृतींच्या तंद्रींत मंद्र संगीताचा धुंद गोडवा
वेळुवनांतील नाजुक शीळ, पतझडीची आर्त सळसळ
सागराचें घनगंभीर गर्जित, अस्ताईचे मंद खर्जातील सूर
सनईसारख्या कोवळ्या गळ्याची तीव्र हुरहूर
कपालाकाशांत शांत घंटानाद
निर्याणगीताच्या शिंगांची साद
महाप्रस्थानाच्या प्रलयलयीच्या मंद संगीताचा धुंद गोडवा

## सारेच दीप कसे मंदावले आता

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझूं विझूं झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असें कुठेच तेज नाही !
थिजले कसे आवाज सारे ?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही ?
या रे या ! द्या जीव ह्या बाणीवर
अशी वाणी निघत नाही !
भावनांना चेव नाही
यौवना आव्हान नाही
संघर्ष नाही, झुंज नाही
जावें ज्यामागे बेधडक
असा झुंजार वीर नाही
कामीं यावा देह जिथे
असा रणसंग्राम नाही !
प्रेतेही उठतील अशा
मंत्राचा उद्घोष नाही !

आशांचा हिरमोड
आणि बंडांचा बीमोड
सारीकडे तडजोड
होऊन, सारे कसे सदविले आता ?

सारेच कसे थंडावले आता !
साऱ्याच आघाडयांवरी ही अशी हो सामसूम
वरतीखाली सामसूम
इकडेतिकडे सामसूम
आजूबाजूस सामसूम
जनमनांतहि सामसूम
हृदयांमधेहि सामसूम
कुठे पोटतिडिक नाही
प्रेमामधेही धडक नाही
जीव ओढून घेईल अशी
डोळयामध्ये फडक नाही
जीवनाला वाव नाही
तारुण्याची चमक नाही, धमक नाही
साहित्यात चैतन्य नाही
संगीतांत इंगित आणि कलेमध्ये उकल नाही
सरळपणाला भाव नाही
साधा सदाचार नाही
जो तो कसा लाचार आहे
[ ह्याची त्याला फूस आहे
घराघरांत घूस आहे !
तेरी चुप मेरी चुप
गुपचुप
सारा हिशेबी व्यवहार आहे !
जो तो जागा धरून आहे
नाही तर अडवून आहे

दबेल असून चढेल आहे
योजनांची चळत आहे
परकियांची मदत आहे
तज्ञांचीहि उणीव नाही
आपली जाणीव नाही !

त्याग त्यागिले भोग मागे
दाता दीनयाचना मागे
शील आपले मोल मागे
सौंदर्याची विक्री चाले
कागदांच्या कपटयांवर !
सारीं स्वरूपें कुरूप झालीं
हुरूप कशाचा नाही चित्ता
सारेच दीप कसे मंदावले आता

# आंत

मनींचें मनिंच राहिलें आंत

बोलत बोलत उगिच कांहितरि जरी उलटली रात
पलटली आता होत प्रभात
मनींचें मनिंच राहिलें आंत

चुकवित दृष्टिस दृष्टि राहिली ओळख काळोखांत
मिसळुनि जात अता सकळांत
मनींचें मनिंच राहिलें आंत

ओठांवरुनी आशय फिरला परत पुन्हा हृदयांत
घुटमळे जो आता शब्दांत
मनींचें मनिंच राहिलें आंत

भुलवित निजपण तरिहि दुजेपण उरवित एकांतांत
विसर ज्याचा पडतो जगतांत
मनींचें मनिंच राहिलें आंत !

# मेघांची भूमि

मेघांची भूमि—
निळ्या अंतराळीं तरंगणारी विविध रंगांची ही चित्रभूमि !
खेळ खेळतात जेथे रविकर
सप्त रंगांच्या रंगपटावर
किमया करीत कोवळ्या छटांची
क्षणाक्षणाला बदलणाऱ्या, अपूर्व नवता प्रसवणाऱ्या रंगसंगतीची

भडक केशरी पटाच्या खाली
फिकट हिरव्या अस्तरावरली
लिंबकांतीची झालर पिवळी
आणखी वरती केशरावर
कुठे कुठे शोभे शेंदरी किनार
कुंकवी गोंडयांची झुपकेदार
मिसळत मग निळ्यांत जात सारी रंगत

इथे जास्वंदी, तिथे जांभळा, तिकडे गुलाबी, राखी रंग होत
मध्येच मोतिया झुळूक इथे
मोतीशिंपल्याच्या रजतगर्भाची लोलकासमान भुलावणी तिथे
शेवटी गडद निळ्याकाळ्याचे गोल कल्लोळ
ज्यावर तापल्या चंदेरी सोनेरी रसाची ढाळ
विनारंगाच्या स्वत:प्रकाशाच्या अंतरंगाच्या अनंत ऊर्मि
प्रकटविणारी ही लीलाभूमि !
मेघांची भूमि !



ग्रंथालय
नों. क्र. २२८
दा. क्र. २५७८६

मेघाची भूमि—
अनेक अथांग महासागरांत विखुरलेली ही द्वीपांची भूमि
भव्य आकाराच्या खंडांचे फुगीर, फुटीर, दंतुर दीर्घ किनारे
समुद्रांत दूरवर घुसलेलीं, वाकडींतिकडीं लांब भूशिरें
निळ्या नागीणींच्यासारख्या नद्या वळसे घेत
जाउनी मिळती त्रिकोणमुखांनी सागरा जेथ
द्वीपकल्पांना जोडीत जाणाऱ्या निरुंद संयोगभूमीमधूनी
आखातातुनी उपसागरांत वाहून नेणाऱ्या अतिआकुंचित सामुद्रधुनी
भूमीने वेढलीं शांत सरोवरें, निर्भर भूमध्यसमुद्र आंत
सुदूरपर्यंत मूळमध्यवर्ती भूभागापासून आसमंतांत
पसरलेलीं लहानमोठ्या ठिपक्यासमान बेटें सहस्र
प्रवाळद्वीपांचे मरकतरंगी कंकण येथे
सरकत दूर तुटून गेलेल्या भूमिखंडाचें महाद्वीप तेथे
तरल, पांढऱ्या अभ्रखंडाचें डोलकाठीला शीड लावूनी
चंद्रकोरीची नौका जातसे त्या द्वीपापर्यंत ह्या द्वीपाहूनी
निरनिराळ्या आकृतींमध्ये सपाट जलांत निम्नोन्नत भूमि
पृथ्वीच्या गोलांत रचूं पाहणाऱ्या विश्वकर्म्याचीही प्रयोगभूमि
मेघांची भूमि !

मेघांची भूमि—
क्षितिजावरली क्रीडाशल्यांची अधांतरींची निरालंब ही पर्वतभूमि !
पायथ्याकडच्या दऱ्यांखोऱ्यांच्या खुज्या डोंगरांची रांगच रांग
ज्यावर धरेच्या वनस्पतींचा परावर्तित हिरवा रंग
सागरतील रंगाच्या धुक्याचे लोट वर जातां नीलरक्त होत
शृंगांच्या काळ्या बाह्यरेषेपाशी रक्तकांचनाचे झोतच झोत
मध्येच एखाद्या शिखरांतून ज्वालामुखीसम अग्निलोळ उठे

खदिरांगाराच्या पाषाणरमाच्या उकळत्या नद्या वाहून आरक्त तडाग साठे
पार्श्वभूमीसम पर्वतराजी उत्तुंग, गौरांग हिमशिखरांची
हस्तिदंतावर कोरीव नक्षीची, ताशीव विल्वरी शुभ्र स्फटिकाची
रजतरंगाचा कैलास इथे, तिकडे धवलगिरी आणखी कांचनगंगा
हिमनद्यांचे प्रपात संथ, वितळत आणि पूराने भरत पृथ्वीच्या गंगा
देवदेवतांची हरगौरीच्या अट्टहासाची, स्वर्गमाध्याची ही विहारभूमि !
मेघांची भूमि !

मेघांची भूमि––
मायावी भासांची इंद्रजालाच्या चमत्कृतींची ही यक्षभूमि !
चंद्रज्योतीच्या भुईनळ्याच्या रजतभास्वर धूम्रमंडळांत
प्रकट होतात शालभंजिका रंगशिळेवर भरतनाट्याचीं आवर्तने घेत
गंधर्व-अप्सरा, किन्नर-किन्नरी, सिद्ध-विद्याधरी, यक्ष-यक्षिणी
पिच्छमेघांचे पिसारे लावून उड्डाण करीत जातात हातांत वाद्यें घेऊनी
स्वर्णकळसांची गंधर्वनगरी मणिकुट्टिमाची अलका इथे
चिरविरहिणी यक्षप्रियेसाठी मेघदूत नेत संदेश जिथे
कलावंतांच्या प्रतिभास्फूर्तीची सृजनशक्तीची प्रत्यक्षांतली ही स्वप्नभूमि
मेघांची भूमि !

# अंत

उदात्त अंत--ऐश्वर्यवंत
अनंत विश्वांत घुमवित ऊर्ध्व शोकसंगीत
उच्छिन्न जीवन भोवताली तरी त्यांत गीतस्वन
आणि आमच्या अश्रूंतहि आहे तेज भरून

शीळ वाजवीत गेला तो निघून
किशोर होता तो यौवनीं नूतन
सरळ ताठर उंच देहयष्टि
अचूक स्थिर तेजाळ दृष्टि

अविचल धीर धीट आणि शांत
होता तो अंताच्या क्षणापर्यंत
अगणित संकटांच्या व्यूहांत
जीवनमृत्यूच्या नित्य द्वंद्वांत

त्याने सर्वस्वाची सेवा आपली
सर्वोच्च कर्तव्यासाठी अर्पिली
अंगिकारला शाश्वत मार्ग
शूरांचा मार्ग, वीरांचा मार्ग

# पीक

पडूं दे हातीं हें पीक सारें बिचाऱ्यांच्या
राबले हे खूप बरें, माणसें नि गुरेंढोरें
म्हातारी अन् लहान पोरें

उन्हींतान्हीं अनवाणी हिंडलीं हीं अर्धपोटीं
रानशेण्या गोळा करून भाजली ही लाल माती
हाडकुळे बैल-हेले जुतून केली भातशेती
नागव्याने कसूनशान लंगोटचा
तुडवली पावलांनी गारामाती
गुडघागुडघा चिखलामधे वाकवाकून दिवसभर
धानाच्या रोपटचांची लावण केली
गाणीं म्हणत उरकली भराभर
वळवित नेलें पाणी आणि निंदण खुरपण करीत गेले वेळेवर
तेव्हा चार महिन्यांनी धान डोलूं लागलें
फुटून आल्या बाळचा आणि लोंब्या लोंबू लागल्या
दाणे भरूं आले, हलके हवेमधे फिरे वास
ओठावरती उमटली दिसूं आली भीरू आस
कष्टलेले प्राणी सारे पोटभर खातील घास
आता वाऱ्या वाहत राहा झुळझुळ असा हप्ताभर
उगा नको जोर आणूं, कोवळें हें धान नको मातीमध्ये लोळवू
आणि ढगा येऊं नको करूं नको गारपीट
उडवून देऊं तिरपिट नको कापणीच्या भरावर

नका आणूं विघ्न कांही चाळे मारे बस करा
पंधरा दिवस धीर धरा
नेऊं द्या ह्यांना हें सुगीचें पीक घरा !

# कोंबडा

मालाच्या धक्क्यावर
पहाट झाली
धुरांतून, धुळींतून, वाफेंतून
कपडीशी तेलकट

बासांच्या पट्ट्यांच्या पेटाऱ्यांत
कोंबलेल्या कोंबडयांचा
सुरू झाला कुचकुचाट
धान्याच्या पोत्यांच्या, मिरच्यांच्या थैल्यांच्या
देवदारी खोक्यांच्या
उलटयासुलटया डागांच्या मोबतींत
गेली होती त्यांची रात
फुटणाऱ्या तांबडयाचा होऊन भास
आरवला त्यांतला एक कोंबडा
'कुकूऽच कू'

आरवण्यांत त्याच्या त्या
कातरतेने कापणाऱ्या आवाजांत
होती एक दुबळी हाक
खेडयांतील विश्वाला
कौलारू घरांना
हिरव्यागार मळ्यांना
नाचणाऱ्या रोपटांना

डवरलेल्या झाडांना, झुडपांना
वेलींनी झाकलेल्या कुंपणांना
कणसें भरूं आलेल्या जोंधळ्याच्या शेतांना
कणग्यांमधील दाण्यांच्या साठ्यांना
जात्याच्या घरघरीला
बारीकशा गळ्यामधून उमडणाऱ्या ओव्यांना
सड्याच्या शिवरांना
दारापुढच्या रांगोळ्यांना
आणि त्याच्या कोंबड्यांना --
अंडीं फोडून आलेल्या तलगांना
तुर्रा उडवीत ठुमकणाऱ्या शेजाऱ्याच्या कोंबड्याला

पिंजऱ्यांत कोंडलेल्या
एका कैदी कोंबड्याची
हाक ती !
आवरण्याचा आर्त रव !
पुसट पुसट होणाऱ्या
साऱ्या त्याच्या जगाचा त्यांत आठव !
कुणीकडून साद नाही
तरी पुन्हा आवरला एकवार
मरणाऱ्या रात्रींतून
मरणाचीच पहाट पाहात
कोंबडा ! !

# रंभागर्भ

वारा कुजबुजे
आकाश ऐकत होतें
रात्रीला थोडीशी लागे चाहूल
रंभागर्भांतून बाहेर येतां
केळीचें फूल !

मिस्किल हासल्या प्राजक्ताच्या कळ्या
त्याहि तितक्यांत होत्या उमलल्या
गुलाब-मोगरे टपोरे बिचारे
जाणतेपणाने झाले गोरेमोरे !
पावसाचे थेंब वेळींच आले
नव्या बाळाला न्हाऊं घातलें
नात्याची पण ती कर्दळीबाई
पंचरंगांचा बाळंतविडा
जरा आधीच घेऊन येई !

थोडी उशीराच पहाट आली
आणि पाहून विस्मित झाली
म्हणाली कांहीसा राग येऊन
कर्तेपणाचा आव आणून
" अगाई कशी नवलाई झाली
सुईण चतुर नसतांना मी
अशी अवेळीं
कशी केळ ही बाळंत झाली ! "

# सांगाती

हातीं हात धरून माझा
चालवणारा कोण तू ?
जेथे जातों तेथे माझा
काय म्हणून सांगाती ?
आवडतोस तूं मला
की नावडतोस ?
माझें मला कळत नाही !
येवढें मात्र जाणवतें की
माझा हात धरून असें चालवलेले
मला मुळीच खपत नाही !
स्वच्छंदाला माझ्या त्याचा करकोचा पडतो ना
झिडकारून तुझा हात
म्हणून दूर पळत जातां
बागडतों, अडखळतों, धडपडतो
केवळ तूं कनवाळू पाठीशीं उभा म्हणून
माझें दुःख जाणवून
उगाच किंचाळत सुटतों
एरव्ही तूं नसतांना
पडलों अन् लागलें तर
पुन्हा उठून हुंदडतों !

खांद्यावर हात माझ्या सदोदित
असा ठेवूं नकोस ना !

अशानेच माझी वाढ खुंटत जाते
असें मला वाटतें ना !
बरोबरीचें वागणें हे खरोखरीचें आहे का ?
खूप खूप माझी उंची एकाकीच
माझी मलाच वाढवू दे
तुझ्याहून नसली तरी तुझ्यासमान होऊ दे
तोवर असें दूरदुरून, तुझा हात दूर करून
मान उंच उभारून
तुझ्याकडे धिटकारून पाहू दें !

## तटस्थ

अंधारी रात्र, सागरकिनारा
एकटाच मी, पडलेला वारा
कुणा न दिसतां अस्ता जाणारा
असाच एक अनोळखी तारा

उगीच थोडेसें जळ चुळबुळे
मिसळत कांही निळ्यात काळें
शिणून आणून तोंडाला फेस
वाळूच्या कणांना सांगत क्लेश

कुणीच कुणाला जाणत नाही
दिसते तरीहि पाहत नाही
कानीं पडे पण ऐकत नाही
कुणीहि आपल्या भानावर नाही

निर्वेद क्षण हा रितेपणाचा
आपला आपण थांग घेण्याचा
तटस्थ मीहि, तटस्थ पसारा
अंधारी रात्र, सागरकिनारा !

# पाहतों हें सर्व आम्ही

पाहतों हें सर्व आम्ही जागच्या जागी बसून
स्वस्थ आणिक शांत चित्तें
ह्या अध:स्तर जीवनाची लाज आम्हां येत नाही
पाहतों आम्ही भुकेले अस्थिपंजर
आंधळे, लंगडे, लुळे, अन् कुष्ठरोगी नागडे
पाहतों आम्ही खुराडीं
त्यांत वर्षाला विणाऱ्या दीन माता
पाहतों हें सर्व आम्ही——
साहतों !

पाहतों व्यवसाय काळे पांढरे
चोरटे अन् उजळ उघडे रोजगार
कुंटिणींनी नाडल्या अज्ञान पोरी
लाचारिच्या गरजेंत विकणाऱ्या स्वत:ला
एरव्ही सच्छील नारी
धूर्त पण मिठ्ठास साठेबाज व्यापारी ठगांचीं
भव्य भांडारें, दुकानें
सट्टाइतांचे कारखाने, मोटरी, उंची हवेल्या
अन् रखेल्या
पाहतों अधिकार, सत्ता मत्त करिते
भ्रष्टवीते सात्त्विकांना मालमत्ता
पाहतों हें सर्व आम्ही——
साहतों !

पाहतों कष्टांत शेती जोतणारे भूमिदास
जीवनाचा अर्थ ज्यांना दोन वेळां दोन घास
वाढतें लेंढारें आणि पोसण्या असमर्थ माता
रोडकीं, रोगी, कदन्नीं वाढलीं निस्तेज पोरें
माणसें, ढोरें-गुरें एकत्र निजणारीं घरें
सर्व खेड्यांचे करूनी शेतखाने राहणारे !
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों ही झुंड, झुंडीचे पुढारी पुंड, आणिक
खोपडी शाबूत फोडाया कुणाची
सज्ज दंडेबाज गुंडे
दहशतीने जें दिलेलें जीवदान
तेंच जीवन मानतों
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों हें सर्व आम्ही
आणखीहि किती तरी वरचेवरी
ह्या अशांना अंत नाही
वैतागतो कोणी कधी जर तडफडून
सत्य बोलूं लागतो
ऐकून तेंहि सर्व घेतो
स्वस्थ आणिक शांत चित्तें
जागचे जागीं बसून
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों ! !

# आई

आठवतें आई फिरफिरून
प्रसन्न शांत तुझें वदन
मूर्तिमंत जणू तृप्त समाधान
विफल ज्यापुढे ज्ञानविज्ञान

आई, तूं तुळशीपुढे बसून
काय पाहिलेंस डोळे मिटून ?
तुझ्या पांढऱ्या केसांमधून
परतलें कसें निवून ऊन ?

आई, तूं अती कष्ट उपसले
दु:खाचे किती मूग गिळले
तेढचा वागणुकी सहन केल्या
शब्दांचे प्रहार वर झेलले
असा काय तुज परिस मिळाला
ज्याने केलेंस लोखंडाचें सोनें
कांहीहि नसतां हातांत कसें
पडूं दिलें नाही कुणास उणें !

आणि तूं म्हणावें देवाने दिलें
सारें कांही मला माझ्या वाटचाचें
साऱ्यांचें सुख खूप पाहिलें
आता न मागणें कांही राहिलें

आई, तू जीवनव्रत उजविलें
कशांत न मन गुंतून ठेविले
सर्वांचें इच्छित सारखे भले
माखर वाटन डोळे मिटले !

# आणीबाणी

अशा कांही रात्री गेल्या ज्यांत काळवंडलों असतों
अशा कांही वेळा आल्या होतों तसे उरलों नसतों
वादळ असें भरून आलें तारू भडकणार होतें
लाटा अशा घेरत होत्या कांही सावरणार नव्हतें
हरपून जावें भलतीकडेच इतके उरलें नव्हतें भान
करपून गेलों असतों इतकें पेटून आलें होतें रान
असे पडत होते डाव सारा खेळ उधळून द्यावा
विरस असे झाले होते जीव पुरा विटून जावा
कसे निभावून गेलों कळत नाही, कळलें नव्हतें
तसें कांही जवळ नव्हतें—नुसते हातीं हात होते

## तळ्याकाठीं

अशा एखाद्या तळ्याच्या काठीं बसून राहावें मला वाटतें
जिथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आली असते
जळाआंतला हिरवा गाळ निळ्याशीं मिळून असतो कांही
गळून पडत असतां पान मुळी सळसळ करीत नाही
सावल्यांना भरवीत कापरें जलवलयें उठवून देत
उगीच उसळी मारून मासळी मधूनच वर नसते येत
पंख वाळवीत बदकांचा थवा वाळून विसावा घेत असतो
दूर कोपऱ्यांत एक बगळा ध्यानभंग होऊं देत नसतो
हृदयावरची विचाराची धूळ हळुहळु जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळ्याच्या काठीं बसून राहावें मला वाटतें !

# खेळणीं

खेळणीं सुंदर लहाणपणीं माझ्यापाशीं होतीं नाना तऱ्हेचीं
कांही पेरकुंडीं स्वत: केलेलीं कांही पितळी कांही लाकडाचीं
चिनीच्या भावल्या जरी नव्हत्या तरी होते दोन मातीचे बैल
कांहीं कळसूत्री करामती होत्या कमान ज्यांची पडते सैल
पुढे हातीं आल्या काचेच्या गोटया भोवरे चक्र्या एक एकामागे
पतंग लहानमोठे लढवाया घोटले मजेत मांज्याचे धागे
फोडलीं मोडलीं किती खेळणीं फुटून फाटून आपोआप गेलीं
थोडें रडूं आलें पण त्यांतूनच नव्यानव्याची हौस वाढली
खेळण्यांच्या जागी खेळ आले आणि जीवनाचाहि खेळ झाला कांही
बाळखेळण्यांमधून मन अजून निघतां निघत नाही !

# दोन वाटा

वाटचुकार वासराशिवाय फिरकलेलें कोणी नसतें
अशा जागीं गेली वाट सरत सरत आली असते
तिथे पुन्हा दोन वाटा फुटलेल्याच्या खुणा दिसतात
एक जरा सरावलेली दुसरीवरती ठसे नमतात
तिने चाहूल नाही म्हणून पाऊल पाऊल ओढून नेलें
सोडून दिल्या वाटेकडे फिरून फिरून पाहूं दिलें
किती वेळ दिसत होती धरली नाही तीच वाट
तिचीं वळणें, हेलकावे, तिचे उतार, तिचे घाट
तिनेच गेलों असतों तर ? ही कदाचित् मिटली असती
तसें व्हावयाचें नव्हतें ! हीच माझी वाट होती !

# जुई

पावसाची सर ओसरून जाते, उगाच तुषार भिरभिरती
इवल्या इवल्या फुलीं भरलेल्या अंगनिथळत्या जुईभवती
आधीच हळवा सुवास कोमळ त्यांत जळाआंत विरघळला
ओल्या झुळकीत भरून वारा नेत असतो, अशा वेळेला
तलम ढगांच्या सात घड्यांतून गाळीव पडतें सौम्य चांदणें
जाळीच्या पड्यामधून दिसते जुईचें नितळ रूप देखणें
कवळ्या फांद्यांचा लवचिक बांधा पाचूच्या पानांत झाकून घेत
शुभ्र शुचितेची सौजन्यकांति हिरवें लावण्य लेऊन येत
मादकता जाते मार्दवीं विरून, सौंदर्य सोज्वळाआड दडतें
सोलीव सुखाचें स्वप्नच एक जीवाला जागतेपणी पडतें !

# श्रावणझड

श्रावणझड बाहेरी मीं अंतरिं भिजलेला
पंखीं खूपसून चोच एक पक्षि निजलेला
अभ्रांचा हृदयभार थेंब थेंब पाझरतो
विझलेला लांब दिवस चिंव होत ओसरतो
उथळ उथळ पल्वलांत संगळून जळ बसतें
क्षणजीवी वर्तुळांत हललेसें भासवितें
चळतें प्रतिबिंब जरा स्थिर राहून थिजतांना
बिंदुगणिक उठलेलें क्षीण वलय विरतांना
झिमझिम ही वाऱ्यासह स्थायी लय धरुन असे
संमोहन निद्रेंतून शब्दांना जाग नसे !

# लावण्य

असे कांही तरी आगळें लावण्य केव्हा कधीकाळीं दिसून जातें
वेगळ्या सौंदर्य-पर्युत्सुक जीवा जन्मांतरींचे सांगत नाते
नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असतें कांही
ठाव त्याचा कधी लागत नाही आणि आठवण बुजत नाही
रूप रेखेंत बांधलेलें तरी मोकळी खेळते त्यांतून आभा
डोळ्याआडच्या दीपज्योतीहून निराळी भासते प्रकाशप्रभा
आधीच पाहिलें पाहिलें वाटतें पहिलेंच होतें दर्शन जरी
स्मरणाच्या सीमेपलिकडलें कुठलें मीलन जाणवतें तरी
पुन्हा तहानेले होतात प्राण, मन जिव्हाळा धाडून देतें
जागच्या जागींच राहून हृदय प्रीतीचा वर्षाव करून घेतें !

## एकाकी

स्वप्नांतल्या मुक्या सावलीसारखी दिसते अशी का आकृती तुझी
बोलत नाहीस, ऐकूंहि न ये का गळ्यांत दाटली हाक तुला माझी
खुणांनीच कांही सांगूं पाहसी किती होती त्यांचे अर्थ वेगळे
काय समजूं मी जोवर ठेविसी झाकून असे पापण्यांत डोळे
भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या
परतून गेले आहेत सगळे आठवणींचे पक्षी थकलेले
दूर कोठे तरी अज्ञात स्थळीं घरट्यांत आता गाढ निजलेले
आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी
ज्यावर आहे मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी !

## उशीराचा पाऊस

असा उशीरा आलेला पाऊस तळहातावर झेलून घ्यावा
टिपून ल्यावा पापण्यावरतीं कपाळीच्या घामामध्यें मिळवावा
डोईंत पेरावा त्याचा ओलावा पाठीवरतून निथळू द्यावा
कोरड पडले ओठ उघडून वरच्या वरतीं चुंबून घ्यावा
त्याला बोलूं नये अधिक उणें आणि काढूं नये त्याचें बहकणें
खोटे भरवसे देत राहणे वाहाणे सांगणे वेळा चुकविणे
सांगूं नये त्याला आपलें गाऱ्हाणें वाट पाहणे अधीर होणें
पापशंका मनीं उभ्या ठाकणें पोटीं धस्स होणें धुसपुसणें
त्याला उचलून क्षितिजाचे बाहू लाडे लाडे उरी घट्ट आवळावा
पाट घड्यावर बसवून त्याशीं कोडकौतुकाचा खेळ खेळावा !

# काळी

काळी धरती सुघड सावळी  गरतीपरिस हिचें राहणें
टोप-पदरांत मान लववून डोळे उचलून वर पाहणें
न्हाणें ऊनऊन झळवणीने वाफाऱ्यावरतीं वाळविणें आंग
विंचरणें केस जाड फणीने सरळ पाडणें नाकावर भांग
नट्टीपट्टीचा सोस नाही हिला बुचडा बांधून थेटते टिळा
गोठपाटल्याच्या हातांत साजऱ्या हरिखें धरिते लोखंडी विळा
एरव्ही दिसते निब्बर राठ नेसते लुगडें घट्ट जुनाऊ
भिजतांच पण एका पावसांत कणकण होतो चिक्कण मऊ
भारीच सोशिक हिची वहिवाट झडीवर झड घेते सामावून
कोरडे पंधरवाडे गेले तरी साहते आंतल्याआंत ओलावून !

परिशिष्टे

**परिशिष्ट : १**

## कविपरिचय

आत्माराम रावजी देशपांडे 'अनिल'
जन्म, ११ सप्टेंबर १९०१
१९२९ प्रेमविवाह

प्रकाशित साहित्य

फुलवात, १९३२ : १९२० ते १९३१ मध्ये लिहिलेल्या भावगीतांचा संग्रह
भग्नमूर्ति, १९४०, दुसरी आवृत्ती १९६५ : १९३९ मध्ये लिहिलेले दीर्घकाव्य
निर्वासित चिनी मुलास, १९४३ : मार्च १९४२ मध्ये लिहिलेले दीर्घकाव्य
पेर्तेव्हा, १९४७, दुसरी आवृत्ती १९५९ : १९३२ ते १९४६ मध्ये लिहिलेल्या भावगीतांचा व मुक्तछंदांचा संग्रह
सांगाती. १९६१ : १९४६ ते १९६१ मध्ये लिहिलेल्या कवितांचा संग्रह, दुसरी आवृत्ती १९६९, तिसरी आवृत्ती १९७१
चिरयौवन : निवडक कवितांचा संग्रह, ११ सप्टेंबर १९७१

अध्यक्ष : मराठी साहित्य संमेलन, मालवण, १९५८
१७ नोव्हेंबर १९६१ : कुसुमावती देशपांडे यांचा मृत्यु.

परिशिष्ट . २

# मुक्तछंद

## (अ) मुक्तछंदाचे वाचन

भग्नमूर्ती ह्या काव्याची रचना छांदस मुक्तछंदात केलेली आहे अक्षरछंद एका चरणकात ठराविक अक्षरसंख्या योजिल्याने सिद्ध होतो. त्यास मात्रांचे वा गणांचे नियोजित बंधन नसते.

हा मुक्तछंद अक्षरछंद असल्यामुळे तो वाचण्याची पद्धत ओवी, अभंग आणि इतर अक्षरछंद वाचण्याच्या पद्धतीसारखीच आहे. प्रत्येक ऱ्हस्व वा दीर्घ अक्षराचा उच्चार दीर्घ अक्षरासारखा दोन मात्रांच्या कालावधीत करावयाचा असतो. ह्यामुळे अक्षरछंदास 'लगत्वातीत' असे म्हटले गेले आहे.

ह्या मुक्तछंदाची उभारणी पाच अक्षरांचा व सहा अक्षरांचा असे दोन चरणक योजून केलेली आहे. एका चरणात (ओळीत) हे चरणक वाटेल तितके व वाटेल त्या क्रमाने योजिता येतात. पाच अक्षरांचा एकच किंवा सहा अक्षरांचा एकच चरणक योजून अथवा इच्छेनुसार त्यांची जुळणी करून एक ओळ तयार होते. एका कडव्यात, विभागात वा स्तंभात कितीही ओळी योजिता येतात,

चरणकांप्रमाणे ओळीचे छेदन असे :—

भग्नमूर्ति आणि । भग्नमंदिर

समोरच आहे । तिचे पडके

अवघे चारच । पाषाणस्तंभ

आहेत उभे ।

साक्ष द्यावया । गतवैभवाची

ह्यातील प्रत्येक अक्षराचा उच्चार अक्षरछंदाच्या पद्धतीप्रमाणे दीर्घ करीत व प्रत्येक चरणकाच्या आद्य अक्षरावर सूक्ष्म आघात वा किंचित वजन देत आणि चरणकाच्या अंती अत्यल्प विराम घेत हा

मुक्तछंद वाचावयाचा आहे. ज्या अक्षरावर सूक्ष्म आघात वा वजन द्याव- याचे आहे त्या अक्षरावर वरील छेदनात उभी रेघ दिलेली आहे व टाळी त्या अक्षरावर पडते. हा आघात वा वजन इंग्रजी 'ॲकसेन्ट्' प्रमाणे सूक्ष्म- पणे द्यावयास पाहिजे. स्थूलपणे दिल्यास वाचन चमत्कारिक होईल.

साधारणतः मुक्तछंद वाचण्याची पद्धत अभंगादी अक्षरछंद वाच- ण्याच्या (स्वरात गाण्याच्या नव्हे) पद्धतीसारखीच आहे.

वरील परिशिष्टाच्या दुसऱ्या परिच्छेदात "प्रत्येक ऱ्हस्व अक्षराचा वा दीर्घ अक्षराचा उच्चार दीर्घ अक्षरासारखा दोन मात्रांच्या काला- वधीत करावयाचा असतो. ह्यामुळे अक्षरछंदास 'लगत्वातीत' असे म्हटले गेले आहे." असे विधान केलेले आहे. पुढे चवथ्या परिच्छेदात "ह्यातील प्रत्येक अक्षराचा उच्चार अक्षरछंदाच्या पद्धतीप्रमाणे दीर्घ करीत" असा वाक्यार्थ आहे. ह्या विधानांचा पुन्हा विचार करता ती स्थूलपणे ठीक असली तरी सर्वस्वी बरोबर नाहीत असे मला वाटते. 'लगत्वातीत' ह्या शब्दाचा अर्थ लघु आणि गुरु ह्या दोन्हीच्या अतीत, म्हणजे लघु नाही आणि गुरु पण नाही असा घ्यावयास पाहिजे. तेव्हा प्रत्येक ऱ्हस्व वा दीर्घ अक्षराचा उच्चार दीर्घ अक्षरासारखा दोन मात्रांच्या कालावधीत कराव- याचा असतो हे म्हणणे चूक. प्रत्येक ऱ्हस्व वा दीर्घ अक्षराचा उच्चार सम- कालावधीत करावयाचा असतो असे म्हणणे अधिक योग्य झाले असते.

गेल्या पंचवीस तीस वर्षांत काव्यवाचनाचा प्रघात खूपच वाढला. मुक्तछंदाचे वाचन तर फारच डौलदार आणि आकर्षकपणे होऊ लागले. त्या वाचनात निरनिराळ्या लकबी प्रगट झाल्या. त्या साऱ्यांचा विचार केला तर मुक्तछंदाचे वाचन त्यांतल्या आशयास योग्य अशा आंदोलनात होते आहे असा प्रत्यय येतो. ऱ्हस्वाचा उच्चार केव्हा ऱ्हस्व तर केव्हा दीर्घ आणि गुरु अक्षराचा केव्हा केव्हा ऱ्हस्व उच्चार असे प्रकार वाच- नात सहजपणे होतात. त्यात दोष नाही, तर परिणामकारक ठसकेदारपणा जाणवतो. ह्या साऱ्या गोष्टी ध्यानात घेतल्या तर आशयाला साजेल

आणि आंदोलन जाणवेल असे लघु आणि गुरु अक्षरांचे ऱ्हस्व वा दीर्घ उच्चार मुक्तछंदाच्या वाचनात करावे हेच म्हणणे सर्वस्वी ठीक होईल. मराठी छंदात अशी परंपरा आहेच. संस्कृत छंदशास्त्राचे सर्वच नियम मराठी छंदाने पाळलेच पाहिजेत असा आग्रह धरण्याची आवश्यकता नाही.

'भग्नमूर्ति' ह्या खंडकाव्यातला पाच आणि सहा अक्षरांच्या चरण-कांच्या स्वेच्छ जुळणीचा मुक्तछंद 'प्रेम आणि जीवन' ह्या काव्याला प्रेरक झालेल्या अत्यंत शोकजनक घटनेचा काव्यात्म आविष्कार करण्याच्या आंतरिक तळमळीतून उत्पन्न झाला. त्या वेळी जे सहजपणे आंदोलनयुक्त उद्‌गारात सुचत गेले तसे लिहीत १५-२-१९३५ च्या मध्यरात्रीला सुरू केलेले ते काव्य १६-२-१९३५ च्या मध्यरात्री पूर्ण केले. म्हणजे चोवीस तास खर्ची पडले असे नाही. त्यावेळी मी रामटेक यथे अवर न्यायाधीश होतो. सबंध १६-२-१९३५ चा दिवस त्याच कामात गेला. जवळ जवळ एकतृतीयांश भाग रामटेक-नागपूर प्रवासात लिहिला, आणि उरलेला नागपूरला पोहोचल्यावर पूर्ण केला. नंतर पुन: पुन: सारे लिहिलेले वाचून त्या स्वाभाविकपणे लिहिलेल्या मुक्तछंदाचे तंत्र काय आहे हे पाहिले व त्याचे थोडक्यात दिग्दर्शन केले.

एका ख्यातनाम मराठी प्राध्यापकाने मुक्तछंदाविषयी एक विधान केले. त्याचा सारांश असा : आधी भाषा मग व्याकरण, त्याप्रमाणे आधी छंद आणि मग छंदशास्त्र असे असावयास पाहिजे. मुक्तछंदाचे मात्र तसे नाही. आधी तंत्रनिश्चिति आणि मग प्रयोग असा प्रकार झाला आहे. हे विधान मुक्तछंदात रचना करणाऱ्या कवीला विचारून केले असते तर बरे झाले असते. त्या कवीचे काय म्हणणे आहे ते ऐकून मग त्याविषयी जसा वाटेल तसा निर्णय घेणे योग्य झाले असते. पण इतर प्रगत भाषांतील साहित्य-समीक्षकांची ही प्रथा मराठीत अजून सुरू व्हायचीच आहे. ही असमाधानकारक स्थिती हळूहळू पालटली तर मराठी साहित्य-समीक्षेचा स्तर उंचावेल. मला येथे हे सांगणे अवश्य वाटते की मी प्रसृत केलेले

'प्रेमजीवन', 'मानवता' इ. मुक्तछंद आशयाच्या अभिव्यक्तीला अनुरूप अशा आंदोलनाच्या जाणीवेने त्या कविता लिहिताना उत्पन्न झाले. नंतर त्या कवितांचे अवलोकन करून त्यांचे तंत्र सांगितले. मुक्तछंद त्या वेळी एक नवीन प्रयोग असल्यामुळे त्याचे तंत्र सांगणे आवश्यक होते. एरव्ही तो वाचकांना आंदोलनाच्या जाणीवेने वाचता आला नसता आणि त्यामुळे त्यांतल्या काव्याचे रसग्रहण करणे त्यांना कठीण गेले असते.

## व) मुक्तछंदच का?

भग्नमूर्ति किंवा माझ्या काही काव्याची रचना मुक्तछंदांतच का केली आहे ह्या प्रश्नाचे विवेचन करण्यापूर्वी मुक्तछंदासंबंधी जे गैरसमज पसरलेले आहेत त्यांविषयी थोडेसे लिहिणे योग्य होईल. खरोखर पाहिले असता मुक्तछंद हा इतका साधा, सुकर आणि मराठी छंदाच्या परंपरेला धरून आहे की त्यास परंपरेच्या परिचितांकडून मुळीच विरोध व्हावयास नको.

तालबद्धता हेच छंदाचे अंतिम लक्षण हा सिद्धांत आता कोणास अमान्य होईल असे वाटत नाही. ह्या सिद्धांतापलीकडेही जाता येण्यासारखे आहे आणि आंदोलन हेच छंदाचे अंतिम लक्षण असे प्रतिपादन करता येणे शक्य आहे. परंतु आंदोलन जी छंदता सूक्ष्मपणे दाखविते तीच स्थूलपणे ताल दाखवितो. तेव्हा आंदोलन व ताल ह्यांच्या शास्त्रीय विवेचनात न शिरता ताल हेच छंदलक्षण हा सिद्धांत पुरेसा उपयोगी असे धरून चालण्यास प्रत्यवाय नाही.

मुक्तछंद तालाची आवश्यकता मानीत नाही हा निष्कारण गैरसमज आहे. छंदास तालाचे बंधन आवश्यक नाही ही मुक्तछंदाची भूमिका नाही, कधीही नव्हती. तालबद्ध अक्षररचना म्हणजेच छंद ही छंदाची व्याख्या पूर्णपणे मान्य करूनच मुक्तछंदाचा प्रयोग केला गेला आहे. हा प्रयोग करणारांना तालाच्या काव्यातील कार्याची पूर्ण ओळखही आहे. मुक्तछंदाची बंडखोरी तालाविरुद्ध नाही, तर तालावर बद्धछंदात जी पोलादी चौकट बसविण्यात येते तिजविरुद्ध आहे. छंदाच्या प्रत्येक ओळीची लांबी ठराविक असली पाहिजे, तीत तालाची नियमित आवर्तनेच आली पाहिजे; त्यात दोन, तीन

वा चार अशा नियोजित ओळी असल्या पाहिजेत. ही छंदाची स्वाभाविक बंधने नव्हत. ह्या गोष्टी म्हणजे छंदावर लादलेली पोलादी चौकट. ह्या चौकटीतून छंदास मुक्त करणे हेच मुक्तछंदाचे उद्दिष्ट. छंदावर लादलेल्या पोलादी चौकटीतून मुक्त झालेला छंद तो तो मुक्तछंद.

ह्या पोलादी चौकटीतून मुक्त झाल्यामुळे मुक्तछंदास आकार राहणार नाही असे व्हावयाचे नाही. मुक्तछंदास आकार राहणारच, पण तो एखाद्या निर्जीव जड पदार्थावर बाहेरून लादलेल्या आकारासारखा राहणार नाही तर अंतर्गत आवश्यकतेने व वापरलेल्या साधनांनी, स्वभावाने बनलेला सजीव आकार राहील.

ह्या ठिकाणी ताल म्हणजे काय हे स्पष्ट करणेही योग्य होईल. छद म्हणजे तालबद्ध अक्षररचना असे म्हणताना वापरलेला ताल हा शब्द इंग्रजीतील 'रिद्म्' ह्या शब्दाचा समानार्थी आहे. तालाचे गतिमानतेत दृग्गोचर होणारे सहज स्वरूप तेच येथे अभिप्रेत आहे. संगीतोपयोगी ताल वा तालप्रस्तार अभिप्रेत नाही.

मुक्तछंदाविषयी १९३१ साली प्रथम लिहिलेल्या 'वागीश्वरी' मासिकातील लेखात मी प्रत्येक नवकाव्ययुगाच्या आरंभी एक नवा छंद कसा प्रचारात येतो हे दर्शविलेले आहे. मराठी नवकाव्याला मुक्तछंदाची आवश्यकता का भासते हे दाखविताना काव्याच्या प्रसाराच्या पद्धतीतला महत्त्वाचा फरक सांगितला होता. तो हा की पूर्वी काव्याचा पठण-श्रवणाच्या योगे प्रसार होत होता. काव्याचे ग्रहण कानांच्या द्वारे होत होते. आता काव्याचा प्रसार मुद्रणाद्वारे होतो. काव्य डोळ्यांनी वाचून मनाने आकलन केले जाते. हा फरक क्रांतिकारक आहे व त्याने यमकाचे काव्यातील स्थान जवळ जवळ नाहीसे झाले. परंतु ह्या क्रांतिकारक फरकाकडे, किंबहुना मुक्छंतदाकडेच मराठी काव्यचिकित्सकांचे लक्ष वेधले गेले नाही. हिंदीत मात्र पंडित हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनी मुक्तछंदाची आवश्यकता प्रतिपादताना ह्या फरकाला फार महत्त्वाचे स्थान दिले आहे. ('कविता का भविष्य' सरस्वती मासिक–हिंदी जानेवारी १९४० चा अंक, पृष्ठ २१) ह्या

फरकामुळे छंदातील स्वरांचे तसेच नियमित तालावर्तनाचेही महत्त्व कमी झाले आहे. काव्य डोळयांनी वाचून मनाने आकलन करावयाचे असल्यामुळे त्यास मनातल्या मनात सहजपणे ज्याचा 'ग्रह' करिता येईल असा ताल हवा. ह्या डोळयांनी वाचून मनाने आकलन करावयाच्या पद्धतीला छंदाच्या चालीचा वा स्वरमेळाचा उपयोग नाही, उलट तिचा जडभार वाटतो. ह्या क्रांतिकारक फरकामुळेही मुक्तछंदाची आवश्यकता उत्पन्न होते.

छंदासाठी काव्य नसून काव्यासाठी छंद आहे, छंद हे काव्याचे वाहन मात्र होय, ह्या गोष्टीचा पुष्कळ वेळा विसर पडतो. ज्या छंदासाठी कवीला आपले सहजस्फूर्त काव्य बदलावे लागते ते छंद काव्योपयोगी नसून काव्य-मारक आहेत. परंपरागत व आज प्रचलित असलेली वृत्ते, जाती वा अक्षर-छंद हे सर्व बद्धछंद आहेत. त्यांवर जी पोलादी चौकट आहे ती अशी :–

( १ ) प्रत्येक चरणात ठराविक अक्षरगण, मात्रागण, अक्षरावली वा मात्रावली असणे आणि त्यामुळे चरणांची लांबी ठराविक असणे.

( २ ) छंदात ओळींची संख्या २, ३, ४ वा अशीच ठराविक असणे.

( ३ ) मराठी संप्रदायाप्रमाणे अंती यमक असणे.

आता ह्या पोलादी चौकटीच्या छंदातून वाहताना काव्यप्रवाहाला किती अडचण पडत असेल ते पाहू.

यमकासारखे कृत्रिम बंधन नाही. ते स्वाभाविकपणे नादसाम्याच्या अंतर्गत प्रचीतीने आले तर त्याज्य नाही, पण ते जुळविण्याचा बहुश: प्रयत्न करावा लागतो पहिल्या ओळीतील अंत्य शब्दाने वा अक्षराने दुसरी ओळ कवीच्या इच्छेविरुद्ध पूर्वनिश्चित होते. समजा, पहिल्या ओळीच्या शेवटी 'मुळे' हा शब्द आला. झाले ! लागलीच दुसऱ्या ओळीच्या शेवटी 'खुळे' 'कुळे' असल्या शब्दांपैकी एखाद्या शब्दाची निश्चिती आपोआपच झाली. मराठी भाषेच्या अफाट शब्दभांडारातल्या पाच पन्नास शब्दांनीच दुसऱ्या ओळींचा शेवट काबीज केला ! अर्थात ज्यांना स्वत:चे विशेष असे काही म्हणावयाचे नसते अशा कवींची ह्यामुळे सोयच होते. त्यांना यमकामुळे दुसरी ओळ सुचते. म्हणजे यमक त्यांच्या विचाराला चालना देते. अशामुळे

काव्य स्फूर्तिप्रवाही व विचारप्रवाही राहत नाही तर यमकप्रवाही व यमकप्रवाहपतित होते. यमकामुळे कवीला जे काही म्हणावयाचे आहे, तेच, अगदी तेच, म्हणता येत नाही. यमकाला जुळेल तसा, व तशी तडजोड करीत करीत त्याला आपला काव्यपसारा पसरावा लागतो.

यमकाइतकीच अडचण वर उल्लेखिलेल्या इतर बंधनांमुळे होते. ठराविक गणांसाठी, मात्रावलीसाठी आणि अक्षरावलीसाठी कवीला शब्दांची फिरवाफिरव करावी लागते. स्वाभिप्रेत शब्द सोडून देऊन छंदास जुळते म्हणूनच काही शब्द स्वीकारणे भाग पडते. काय म्हणावयाचे ते संपले तरी ओळीची ठराविक लांबी व संख्या भरली नसल्यामुळे निरर्थक शब्दयोजना करावी लागते. निरुपयोगी दर्शक सर्वनामे, निरर्थक अव्यये आणि पोकळ विशेषणे ह्यांची बिगार भरती करावी लागते. छंदातील ओळींची संख्या नियमित असल्यामुळे ती भरताच पूर्णत्वाचा आभास उत्पन्न होतो. त्यामुळे विचारप्रवाह संपला नसला तरी प्रत्येक श्लोकान्ती अडखळल्यासारखा होतो. ह्या सर्व अडचणींमुळे काव्य ही एक नुसती काव्यप्रवाहाची व छंदबंधनांची तडजोड होते. सारांश ह्या छंदबंधनांतून काव्य पार पाडणे म्हणजे एक विपत्तींची चढाओढच होते. अशा छंदातील काव्य कोणतीही एखादी संवेदना वा कल्पना कवीला कोणत्या क्रमाने प्रगट झाली हे पाहण्याच्या दृष्टीने तर अगदीच निरुपयोगी असते; कारण त्यात केवळ छंदसिद्ध्यर्थ फार फेरफार झालेले असतात.

छंदावर बसविलेल्या ह्या पोलादी चौकटीतून काव्यप्रवाहाला सोडविण्यासाठी मुक्तछंद आवश्यक आहे.

तालाच्या बंधनाचा तरी स्वीकार का करावा हा प्रश्न खरोखर निघू शकत नाही. जर कोणी काढलाच तर त्याला उत्तर असे की मुक्तछंद हा 'छंद' असून 'मुक्त' आहे. छंद असण्यास जी आवश्यक गोष्ट, म्हणजे ताल, ती त्यात असलीच पाहिजे. एरव्ही तो 'छंद' राहणार नाही. 'काव्याला छंदाची आवश्यकता आहे काय ?' हा प्रश्न मात्र निघू शकतो. काव्य हे पद्यात तसे गद्यातही असू शकते. पण काव्याचे स्फुरण उत्कट भावनेतून व

भावनात्मक विचारातून होत असल्यामुळे ते स्वाभाविकपणेच आंदोलनयुक्त व तालबद्ध असते. गद्यातील काव्यमय भागसुद्धा आंदोलनयुक्तच असतो.

मराठी काव्याच्या १९३५ पासून आजपर्यंतच्या कालखंडाचे अवलोकन केले तर आता मुक्तछंद कवींनी आणि रसिकांनी पूर्णपणे मान्य आणि स्वीकृत केला आहे असे समाधानपूर्वक म्हणावेसे वाटते. एवढेच काय पण १९३५ साली अग्रेसर असलेल्या ज्या कवींनी मुक्तछंदाची हेटाळणी केली त्यांनी पुढे जणू अगतिकपणेच स्वतःही मुक्तछदात रचना करण्यास सुरुवात केली. हे मुक्तछंदाच्या यशाचे आणखी एक गमक आहे. 'भग्नमूर्ति' हे काव्य मुक्तछंदात नसते आणि एखाद्या बद्धछंदात असते तर अधिक बरे झाले असते असे म्हणणारे समीक्षकही आता नाहीत. पूर्वी ज्यांनी तसे म्हटले त्यांच्या मतांना आता काहीच मोल उरलेले नाही, कारण आज बहुतांश उत्तम कविता मुत्तछंदाश्रयी झालेली आहे.

मुक्तछंदाचे प्रवर्तन ही आधुनिक मराठी काव्यातील क्रांतिकारक घटना आहे व तिने मराठी काव्याचा कायापालट केला हे उघड सत्य आहे; हे मी म्हणायच्या आधीच छंदशास्त्राच्या विद्वान अभ्यासकांनी लिहून टाकले आहे हे फार बरे झाले. तरी पण छंद हे काव्याचे वाहन मात्र आहे हे मी पूर्वीच निक्षून सांगितले आहे. केवळ मुक्तछंदाचा आश्रय घेतल्याने काव्य निर्माण होते असे नाही, आणि बद्धछंदात काव्य असू शकत नाही असेही नाही.

कवीच्या सहजस्फूर्त आशयांशी आणि त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपाशी छंद आपोआपच निगडित होत असतो. ज्या आशयाच्या अभिव्यक्तीला बद्धछंदाचा अडथळा होतो तशा प्रकारच्या आशय अभिव्यक्तीला मुक्तछंद हे एक नवीन वाहन मिळाले आणि ते मराठी काव्याच्या विकासाला पोषकच झाले, हे गेल्या तीस वर्षांतील मराठी कविता पाहिल्यास स्पष्टपणे दिसून येते.

तालबद्धता हेच छंदाचे अंतिम लक्षण हा सिद्धांत पुरेसा उपयोगी असे धरून चालण्यास प्रत्यवाय नाही; असे म्हणतावेळी मी, ह्या सिद्धांतापलीकडेही जाता येण्यासारखे आहे आणि आंदोलन हेच छंदाचे अंतिम लक्षण

आहे हे प्रतिपादन करता येण्यासारखे आहे असे सूचित करून ठेविले होते

छंदशास्त्राच्या अधिकारी व्यक्तींनी १९३१ ते १९४० आणि नंतरही मुक्तछंदाविषयी बरेच लिहिले. मुंबई मराठी साहित्य संघात 'मुक्तछंदाचे शेषप्रश्न' ह्या विषयावर मी एक भाषण केले होते. त्यात त्यांच्या विचारांचा परामर्श घेतला होता. ताल, तोल आणि आंदोलन ही छंदाची तशीच मुक्त-छंदाचीही लक्षणे आहेत; ताल आणि तोल हे आंदोलनाचेच आविष्कार आहेत; हा माझ्या प्रतिपादनाचा सारांश होता.

मी ताल हा शब्द इंग्रजीतील 'रिदम्' ह्या अर्थी वापरला आहे. तोल म्हणजे 'बॅलन्स' आणि आंदोलन म्हणजे 'केडन्स्' हे स्पष्ट करून ठेवतो. काही छंदशास्त्रावरील लिखाणात 'ताल' आणि 'लय' हे दोन शब्द समा-नार्थी वापरण्यात आलेले दिसून येतात. त्यामुळे थोडा घोटाळा उत्पन्न झालेला आहे. माझ्या मते 'ताल' हा शब्द 'रिदम्' ह्या अर्थी वापरावा आणि 'लय' हा शब्द 'टेम्पो' ह्या अर्थी. ताल तोच राहू शकतो; पण लय विलंबित, मध्य आणि द्रुत अशी भिन्न होऊ शकते. हे ध्यानात घेऊन ताल आणि लय हे शब्द वेगळ्या पण निश्चित अर्थाने छंदशास्त्रात वापरले तर बरे होईल.

वरील परिशिष्टात यमकासंबंधी जे विवेचन केले आहे त्यावरून, मी मुक्तछंदात यमक नसलेच पाहिजे अशा मताचा आहे, असा काही लोकांचा गैरसमज झालेला दिसला. असे आत्यंतिक मत कोणी मला चिकटवू नये म्हणून मी यमक स्वाभाविकपणे नादसाम्याच्या अंतर्गत प्रचीतीने आले तर त्याज्य नाही, ह्याचाही निर्देश करून ठेवलेला आहे. पण त्या वाक्याकडे दुर्लक्ष झालेले दिसले. मुक्तछंद निर्यमक आणि सयमक दोन्ही प्रकारचा असू शकतो. 'तुकान्त' आणि 'अतुकान्तही' असू शकतो. मात्र यमक अंत-र्गत नादसाम्याच्या प्रतीतीने आणि ओघाने आलेले पाहिजे; कृत्रिमपणे जुळविलेले नको. कृत्रिम यमक जसे काव्यहानिकारक आहे तसेच स्वाभा-विकपणे आलेले यमक बुद्धिपरस्पर टाळणे हेही.

परिशिष्ट : ३

## काही वृत्तविषयक नोंदी

चिरयौवन: वृत्त पंचचामर, कलिंदनंदिनी 'उद्या' ही कविता याच वृत्तात आहे.

प्रेमाचें ममत्व : वृत्त शिखरिणी

शोध : जाति पादाकुलक

सारंग : छंद ओवी ( शिथिल रचनेची )

सायंतारा : जाति पादाकुलक

आळवणी : छंद अभंग

फुलवात : छंद अभंग ( अष्टाक्षरचरणी )

हाक : जाति व अक्षरछंद ह्यांचे मिश्रण.

ओळी १, ६, १२, १९, जाति धवलचंद्रिका,

भृ । भृ । भृ । + ; ओळी ११, १७, १८, जाति धवलचंद्रिकाच, पण

भृ । भृ । भृ । ˘+ इतर ओळी ५+५ ह्या निर्झरगीत अक्षरछंदाच्या.

पावसाळा : अक्षरछंद, ग्रांथिक ओवी

झाला अंधार बाहेर : अक्षरछंद, ८ × ३ + ६

घराकडे जातां : अक्षरछंद शुद्धसती

शर्वरिणी : जाति मदनरंग

झळ : जाति भूपति पण बांधणी निराळी. मात्रामापन करताना उच्चारातील प्रसरण संकोच ध्यानात घ्यावे. 'वाट' कवितेवरची टीप पाहावी.

प्रीती तुझी माझी अक्षरछंद. पहिल्या बारा ओळींच्या सहा ओळी धरायच्या. त्या चौदा अक्षरी लवंगलता छंदाच्या आहेत. नंतरच्या चार म्हणजे दोन ओळी, पंधरा अक्षरी हरिभगिनी छंदाच्या आहेत. शेवटच्या चार म्हणजे दोन ओळी पुन्हा लवंगलता छंदाच्या आहेत.

गरीब आणि पावसाळा : जाति हरिभगिनी, स्वर्गंगा

वाट . पद्मावर्तनी जाती. ह्या गीताच्या चालीत, 'मला' 'वाट,' 'दाट,' 'नाग,' 'पाय,' 'साग' 'पान,' 'जरा' व 'घाट' या शब्दातील गुरु अक्षरांचा संकोच आहे. त्या गुरु अक्षरांचा उच्चार लघु अक्षराच्या मात्राकालात आहे. ह्याप्रमाणे प्रत्येक ओळ सोळा मात्रांची आहे. जुन्या मराठी गीतांत ढंगाने वा ठसक्याने शब्द उच्चारण्यासाठी असा गुरु अक्षरांचा संकोच रूढ आहे.

श्री ज्ञानेश्वराच्या समाधीपाशी : अक्षरछंद, गजवदन अभंग

प्रेम आणि जीवन : पाच आणि सहा अक्षरांच्या चरणकांच्या स्वैर जुळणीने सिद्ध होणारा मुक्तछंद या काव्याच्या निमित्ताने प्रथम सुचला सध्या हाच मुक्तछंद रूढ झालेला आहे. यास 'प्रेमजीवन' हे नाव मी सुचवितो. 'सुप्त ज्वालामुखी', 'भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन', 'पेर्तेव्हा' या कविता याच (प्रेमजीवन) मुक्तछंदात आहेत.

धुंवारी · अक्षरछंद देवद्वार, अभंग

मानवता : ह्या कवितेचा मुक्तछंद 'प्रेमजीवन' मुक्तछंदाहून निराळा आहे. चरणकांच्या दृष्टीने त्याचे तंत्र दोन अक्षरी व तीन अक्षरी चरणकांचे आहे, परंतु वाचावयाची पद्धत उच्चारानुसारी आणि आघातप्रधान आहे. ओळींची रचना आघातांच्या आंदोलनाप्रमाणे असून, आघात शब्दोच्चारातील आघातांशी जुळतील असे आहेत. ह्या प्रकारास मी 'मानवता' हे नाव सुचवितो.

'धडकी', 'बंड' या कविता या 'मानवता' मुक्तछंद प्रकारात आहेत.

आता मुक्तछंद सरसहा रूढ झाला असल्याने यानंतरच्या कवितांचा छंददृष्टचा इथे मी विचार करीत नाही. एखादा छंदशास्त्रज्ञ पुढेमागे ते कार्य करीलच.

परिशिष्ट : ४

# टिपणे

## प्रेम आणि जीवन :

पेरीना भरूचा ही पारशी तरुणी व चमनलाल धवान हा पंजाबी तरुण. या दोघांनी नागपूर येथील तेलंगखेडी तलावात ता. १३-२-१९३५ रोजी एकत्र आत्महत्या केली. त्या घटनेने विद्ध होऊन लिहिलेल्या खंड-काव्यातील शेवटचा भाग इथे दिला आहे.

पुतळीघर म्हणजे सूत कातण्याची गिरणी.

## भग्नमूर्ति :

'भग्नमूर्ति' ह्या काव्याचा लेखनारंभ तारीख ७ मे १९३५ रोजी नागपूर येथे झाला व ते रामटेक येथे ता. २० जून १९३५ रोजी लिहून संपूर्ण झाले.

## भग्नमूर्ति आणि भग्नमंदिर :

ही त्रिविक्रम वामनाची मूर्ति नागपूरच्या ईशान्य दिशेस २४ मैलांवर असलेल्या रामटेक ह्या प्रसिद्ध क्षेत्रस्थळी आहे. 'काशीयात्रेचे महाद्वार' म्हणून रामटेकची प्रसिद्धी पूर्वीपासून आहेच. महाकवि कालिदासाने मेघदूतात उल्लेखिलेला रामगिरि म्हणजे रामटेकच असें प्राच्यविद्याविशारदांचे मत आहे. (प्रा. वा. वि. मिराशी, "कालिदास" पृ. ३९, १२०, १२१)

रामलक्ष्मणांची पुरातन देवालये ज्या गडावर आहेत, त्याच गडाच्या वराहद्वाराच्या ईशान्य दिशेस एका उंचवटयावर ही भग्नमूर्ती व तिचे भग्नमंदिर आहे.

मूर्ती लाल रंगाच्या पाषाणाची असून तिची उंची ५ फूट ९ इंच व रुंदी ४ फूट ८ इंच आहे.

आपल्या संस्कृतीचा लोकांस किती विसर पडला आहे ह्याची कल्पना रामटेकच्या लोकांची ह्या मूर्तीविषयी माहिती ऐकली म्हणजे येते. रामटेकचे लोक ह्या पडक्या देवळास 'भाऊबहिणीचे देऊळ' म्हणतात. वामनाच्या मूर्तीस भावाची मूर्ती समजून वळीच्या मूर्तीस वहिणीची मूर्ती मानतात. वामनाच्या मूर्तीवर पावसाच्या पाण्याने जागोजाग बुरशीचे डाग उठलेले आहेत. ह्यावरून तेथील लोकांनी अशी आख्यायिका बसविली आहे की भावाने वहिणीस लाथ मारल्यामुळे त्याच्या अंगावर फोड आले. त्यांच्या मते हेच दृश्य त्या मूर्तीत दाखविलेले आहे !

प्राच्यविद्याविशारद प. वा. डॉ. हिरालाल ह्यांनी मूर्ती वामनाची आहे व अति पुरातन आहे असे म्हटले आहे. [ नागपूर जिल्ह्याचे गॅझेटि-अर १९०६ पृष्ठ ३३३ ] मूर्ती निःसंदेह त्रिविक्रम वामनाची असून तिच्या शिल्पावरून ती फार पुरातन असावी असे वाटते. हिंदुस्थानातील वाम-नाच्या इतर मूर्तीशी (वेरूळ येथील) तुलना केली असता ही मूर्ती किती-तरी पट कलापूर्ण व सुंदर आहे असे दिसेल.

ह्या मूर्तीसमोरचे सध्या भग्न असलेले मंदिर अगदी लहानसेच आहे. परंतु आजूबाजूंच्या खुणा पाहिल्या असता पूर्वी मोठे असावे असे वाटते. सध्या ह्या मंदिरास सहा खांब आहेत. त्यांतील चार कारागिरीचे असून दोन साधे आहेत. काही तुटलेले खांब व त्यांवरील उथळचा बाजूला रचून ठेविलेल्या आहेत.

भग्नमूर्ती व मंदिर प्राचीन स्मारक संरक्षण कायद्यान्वये संरक्षिले आहे. तसे विज्ञापन तेथे लाविलेले आहे. पण तेवढयाने उपद्रवी लोकांची आगळीक पूर्णपणे थांबली नाही.

ह्या नंतर काही वर्षांनी नागपूर येथील मध्यप्रदेश (आता विदर्भ) संशोधन मंडळाच्या प्रयत्नामुळे ह्या भग्नमूर्तीच्या संरक्षणाची व्यवस्था केंद्रिय पुरातत्त्व विभागाने केली आहे. मूर्तीभोवती आता एक लोखंडी गजाचा पिंजरा बांधला आहे. त्यामुळे मूर्तीचे रक्षण झाले खरे, पण पूर्वीचे

उदात्त रमणीय दृश्य आता भंगून गेले आहे. मूर्तीच्या रक्षणाची व्यवस्था सौंदर्यपूर्ण दृश्याचा विघाड आणि लोप होणार नाही अशा कलापूर्ण पद्धतीने करावयास पाहिजे होती. त्यासाठी प्रयत्न करावयास पाहिजे.

**कलाविध्वंसक नृशंस** : समानार्थी इंग्रजी शब्द 'व्हॅन्डल्स्'.

**म्हणती आहे. हा . इत्यादी :** मंदिराच्या व मूर्तीच्या रक्तपाषाणाचे, उपद्रवी लोक चोरून छिलून तुकडे का नेतात, या प्रश्नाचे उत्तर माहितगार लोकांकडून असे मिळाले.

**कमलबंध** : समानार्थी इंग्रजी शब्द 'लोटस् मोटिफ्'. भारतीय स्थापत्यशास्त्रात पद्मबंध, पंकजबंध वा कमलबंध हेच शब्द ह्याअर्थी रूढ आहेत. 'मोटिफ्' म्हणजे कलाकृतीतील वा कलात्मक संयोजनेतील घटक असणारा विशेष, प्रमुख व प्रधान आशय, उद्देश, वा कल्पना.

**अंबाळ्यामध्ये** 'अंबाळा' हे रामटेकच्या टेकडीच्या पूर्वेकडील पायथ्याशी असलेल्या तलावाचे नाव आहे. ह्याच जलाशयात वनवासात असताना सीतेने स्नान केले अशी आख्यायिका आहे. [ "यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु" मेघदूत– कालिदास ] अंबराजाने ह्या पाण्यात स्नान केले असता त्याचे कुष्ट गेले. त्यामुळे त्याने हा जलाशय बांधून काढला, म्हणून त्यास अंबालय (अंबाळे) म्हणतात, ( नागपूर जिल्ह्याचे गॅझेटिअर १९०६ पृ. ३३३. ) नागपूर वऱ्हाडच्या प्रदेशातील मृतांच्या अस्थी ह्या तलावात टाकण्यासाठी आणतात.

**रामगिरीवर** : रामगिरी हे रामटेकचे पूर्वीचे नाव. उल्लेख कालिदास– मेघदूत. प्रभावती गुप्ता हिचा वऱ्हाडातील ऋद्धपूरचा वाकाटककालीन ताम्रपट– 'रामगिरिस्वामिन : पादमूलात्.' (भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ३, अंक २–३–४ पृ. ३९)

**सिंदुगिरोभंवती** : रामटेकचे दुसरे एक नाव. उल्लेख–रामटेक येथील लक्ष्मणमंदिरातील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख, ( प्रा. मिराशी व रा. ल. रा. कुळकर्णी. सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ ११५.)

**वाकाटकांची** : वाकाटक हा राजवंश, विदर्भात व त्यालगतच्या प्रदेशावर सुमारे इ. स. २०० ते ५०० पर्यंत अत्यंत वैभवात नांदला. ह्यांचे शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत. ( जयस्वालकृत हिस्टरी ऑफ इंडिया, १५० ते ३५०, प्रा. मिराशीकृत ' कालिदास ' )

**राम-लक्ष्मण मंदिरांची** : रामटेक गडावरील प्राचीन मुख्य मंदिरे.

**भोसले महाल, बाराद्वारीच्या** : देवळाच्या परकोटाच्या आतील इमारती. बाराद्वारीस ' रामझरोका ' असे म्हणतात. तेथून चहूबाजूंचा देखावा फारच सुंदर दिसतो.

**नऊ तालांची** . ताल हे शिल्पशास्त्रातील एक लांबी-रुंदीचे परिमाण आहे. बारा अंगुळे म्हणजे एक ताल. नरमूर्ती दहा तालांची, क्रूरमूर्ती बारा तालांची, असुरमूर्ती सोळा तालांची, बालमूर्ती पाच तालांची व कुमारमूर्ती सहा तालांची असावी. तसेच, सत्ययुगातील दहा तालांची, त्रेतायुगातील नऊ तालांची, द्वापारयुगातील आठ तालांची व कलियुगातील सात तालांची असावी असा शिल्पशास्त्राचा दंडक आहे. मूर्तिकार सामान्यत नऊ तालांची मूर्ती करितात. ( शुक्रनीति; हिंदू व्ह्यू ऑफ आर्ट, मुल्कराज आनंद; सम् नोट्स ऑन इंडियन आर्टिस्टिक ॲनॉटमी, अवनींद्रनाथ टागोर.)

**अतिभंगांत** : हिंदू शिल्पशास्त्रांत मूर्तींचे ठाणमाणावरून चार प्रकार सांगितले आहेत, ते असे:–

(१) **समभंग** : सर्व बाजूंना सारखा तोल असणे. सात्त्विक व ध्यानस्थ मूर्तींसाठी, (२) **अभंग** · एका पायावर किंचित भार देऊन ध्यानस्थ उभे असणे. ध्यानस्थ मूर्तींसाठी. (३) **अतिभंग** . जोराच्या वाऱ्याने जसा वृक्ष वाकतो त्याप्रमाणे भावनाभराने फार वाकून उभे असणे. प्रहरण वा संहारासारख्या कृती करणाऱ्या मूर्तींसाठी. (४) **त्रिभंग** : अतिभंगाचा एक प्रकार. तीन ठिकाणी वाकलेल्या मूर्तींसाठी. (ग्रंथ : वर उल्लेखिलेले).

**उरुमाळ** : दोन्ही दंडांस बांधून मांड्यांपर्यंत पोचणारी माळ.

**दानशूर आणि महाबली** : 'येन बद्धो बली राजा दानशूरो महाबली' रक्षाबंधन मंत्र.

**प्रभामंडळ** : मूर्तीच्या मुखाभोवतीचे किरणांनी दाखविलेले तेजाचे वर्तुळ.

**अद्भुत वामन** : श्रीजयदेव कवीने गीतगोविंदात वामनावताराचे वर्णन असे केले आहे—

'छलयसि विक्रमणे बलिमद्भुतवामन
पदनखनीरजनितजनपावन
केशव धृतवामनरूप
जय जगदीश हरे।'

**रेषासंगति** : समानार्थी इंग्रजी शब्द 'हार्मनी ऑफ लाइन्स्'.

**अनाहतनाद** : प्रहरणाशिवाय उत्पन्न झालेला आवाज.

## धुंवारी

धुंवारी म्हणजे जोराचा पाऊस पडत असताना दिसणारे जलकणांचे धुके. धुंवारी दाटलेली दिसली म्हणजे आणखी जोराचा पाऊस येणार असे समजतात.

## शर्वरिणी :

शर्वरिणी म्हणजे इंग्रजी सेरेनेडसारखे गीत.

## निर्वासित चिनी मुलास :

ह्या खंडकाव्याचा शेवटचा भाग येथे दिला आहे.

**अमरपक्षी** : फिनिक्स

**शांति-भिरुंड** : 'गंड-भिरुंड' या मूळच्या शब्दावरून. 'गंड-भिरुंड' हा एक भारतीयांचा काल्पनिक प्रचंड पक्षी आहे. हा एवढा प्रचंड पक्षी आहे की, एका पंजात दोन-दोन हत्ती धरून उड्डाण करीत आहे, असे ह्याचे

चित्रण असते. ह्याचे चित्रण जवळपास म्हणजे रामटेकच्या पुरातन अवशेषावर पाहावयास मिळेल. 'गंड-भिरुंड' हा शब्द मूळचा कानडी असावा.

भग्नमूर्तीचें पुनदर्शन :

'भग्नमूर्ती' हे काव्य रामटेक येथे २० जून १९३५ रोजी पूर्ण झाले. त्यानंतर सात वर्षांनी २०-६-१९४२ रोजी पुन्हा त्या मूर्तीचे दर्शन झाले. त्या दिवशी रामटेक येथे लिहिलेली कविता.

फुलचिमणी :

फुलचिमणी किंवा फुलसुंगणी ही अतिलहान आकाराची आणि विविध आकर्षक रंगाची चिमणी. इंग्रजीत तिला सन्बर्ड म्हणतात.

दा. क्र. २१७९६

REFBK-0021496

REFBK-0021496